❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २८३ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



थोडक्यात...

शं. ना. नवरे यांच्या कथांचे अभिवाचन

मुंबई : दैनिक संध्या

ज्येष्ठ साहित्यिक आणि कथाकार शं. ना. नवरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून 'शन्ना... कथानुभूती' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आयोजित 'पु. ल. कट्टा' या कलाकारांच्या हक्काच्या व्यासपीठावर करण्यात आले आहे. हा अभिवाचनाचा कार्यक्रम शुक्रवार, ९ ऑक्टोबर २०२६ रोजी संध्याकाळी ६:३० वाजता अकादमीच्या कलांगणात रंगणार असून हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे. शं. ना. नवरे यांच्या अविस्मरणीय कथांना अभिवाचनातून उजाळा देणारा हा कार्यक्रम साहित्य आणि कलाप्रेमींसाठी एक विशेष मेजवानी ठरणार आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध कलाकार प्रसाद फणसे, उदय सबनीस, अनुपमा ताकमोगे, हेमा निकम आणि विवेक जोशी हे कथांचे अभिवाचन करणार आहेत. साहित्य, कला आणि संस्कृतीचा वारसा जपणाऱ्या 'पु. ल. कट्टा' या हक्काच्या व्यासपीठावर होणाऱ्या या सुंदर साहित्यिक अनुभवाचा आस्वाद घेण्यासाठी सर्व रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

सुशोभीकरणाला गती द्यावी – मंत्री नितेश राणे

मुंबई : दैनिक संध्या

रायगड जिल्ह्यातील आरावी समुद्रकिनाऱ्याच्या सुशोभीकरणाचे काम मार्गी लावण्यासाठी आवश्यक परवानग्या व विभागीय अडचणी दूर करून कामाला गती देण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आरावी समुद्रकिनाऱ्याच्या पर्यटनदृष्ट्या विकास होणे महत्वाचे असून, याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याची सूचना केली होती. भाऊचा धक्का ते दिवेआगार प्रस्तावित रो रो सेवेबाबत, बागमांडला जेट्टी येथील वाहनतळाच्या पार्किंगबाबत, मौजे कारविणे येथील श्रीकृष्ण जेट्टीची दुरूस्ती व जेट्टीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाबाबत, दिवेआगार जेट्टीबाबत, आरावी समुद्रकिनारी सुशोभीकरण, मुळगांव बंधारा लगतच्या जमिनीच्या महाराष्ट्र सागरी मंडळाची मालकी करण्याबाबत मंत्रालयात आढावा बैठक झाली. यावेळी पर्यटन व विकासाच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. आरावी समुद्रकिनारा गेल्या दीड-दोन वर्षांत पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत असून पर्यटकांची संख्या वाढत आहे. त्यामुळे या ठिकाणी आवश्यक पायाभूत सुविधा, स्वच्छता व सुशोभीकरणाची कामे होणे गरजेचे असल्याचे मंत्री आदिती तटकरे यांनी नमूद केले. पर्यटकांची वाढती वर्दळ लक्षात घेता अनधिकृत स्वरूपात स्टॉल किंवा झोपड्या उभारल्या जाण्याची शक्यता असून त्यापूर्वीच नियोजनबद्ध पद्धतीने समुद्रकिनाऱ्याचा विकास करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. आरावी समुद्रकिनाऱ्यालगत कांदळवन, बफर झोन तसेच सागरी किनारपट्टी नियमन क्षेत्राशी संबंधित बाबींची तपासणी करून संबंधित विभागांनी आवश्यक कार्यवाही करावी, अशी चर्चा यावेळी झाली.

दुष्काळावर मुख्यमंत्र्यांनी दिल्लीत घेतली शाहांची भेट

केंद्राचे पथक उद्याच येणार; MPSC आंदोलन हायजॅक करून अतिडावी राजवट आणण्याचा काँग्रेसचा डाव!

■ मुंबई (दै. संध्या)

"महाराष्ट्रातील 32 जिल्ह्यांमध्ये यंदा भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून राज्यातील तब्बल 80 टक्के तालुके दुष्काळाने पूर्णपणे बाधित झाले आहेत. या अस्मानी संकटाचा सामना करण्यासाठी केंद्राने राज्याला विशेष आर्थिक पॅकेज द्यावे, यासाठी केंद्रीय गृहमंत्री तथा आपत्ती व्यवस्थापन (NDRF) समितीचे अध्यक्ष अमित शाह यांची भेट घेऊन राज्याचा प्राथमिक मदत प्रस्ताव सादर केला आहे. केंद्राचे विशेष पाहणी पथक 8 ते 11 ऑक्टोबरदरम्यान महाराष्ट्रातील दुष्काळी भागाची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. केंद्र सरकारची मदत येईपर्यंत वाट न पाहता, राज्य शासन आपल्या तिजोरीतून शेतकऱ्यांना तत्काळ थेट मदत वितरीत करण्यास सुरुवात करेल," अशी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात आयोजित पत्रकार परिषदेत केली. या दौऱ्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याशी विविध प्रश्नांवर सविस्तर बैठका घेतल्या. यावेळी त्यांनी नागपूर विमानतळाचा विस्तार, दुष्काळी निकषांतील शिथिलता, पुण्यातील MPSC आंदोलन आणि काँग्रेसकडून सुरू असलेल्या देशव्यापी आंदोलनांवरून विरोधकांवर अत्यंत बोचरी टीका केली.



राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत केंद्रीय गृहमंत्र्यांशी झालेल्या चर्चेचा तपशील मांडताना मुख्यमंत्री म्हणाले, "राज्यात पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून पिण्याच्या पाण्याचे आणि जनावरांच्या चाऱ्याचे मोठे संकट निर्माण झाले आहे. राज्यातील 80 टक्के तालुके दुष्काळाच्या छायेत आहेत."

"केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखालील 'इंटर-मिनिस्ट्रीयल ग्रुप'कडे राज्याचा प्राथमिक प्रस्ताव सुपूर्द करण्यात आला आहे. त्यानुसार उद्या, 8 ऑक्टोबरपासून 11 ऑक्टोबरपर्यंत केंद्रीय पथक महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत प्रत्यक्ष 'ग्राउंड ट्रुथिंग' व पाहणी करणार आहे. पथकाचा अहवाल प्राप्त होताच केंद्राकडून विशेष मदत मंजूर केली जाईल."

नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तारीकरणासंदर्भात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासोबत झालेल्या बैठकीविषयी माहिती देताना फडणवीस म्हणाले, "नागपूर विमानतळावर नवीन टर्मिनल इमारत बांधण्यासाठी भारतीय हवाई दलाची (Air Force) 27 एकर जमीन आवश्यक होती. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हेही या बैठकीला व्हर्च्युअल माध्यमातून उपस्थित होते. हवाई दलाने टर्मिनलच्या बांधकामासाठी लागणारी जमीन तत्काळ राज्य शासनाकडे हस्तांतरित करण्याचे मान्य केले आहे, तर उर्वरित भागाचे बांधकाम पूर्ण करून तो भाग नंतर हस्तांतरित केला जाईल."

"विमानतळाच्या टेक्निकल क्षेत्रात हेवी मशिनरीच्या हालचालींसाठी हवाई दलाने तत्त्वतः मंजुरी दिली असून, कामात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी एक स्वतंत्र एसओपी (मानक कार्यप्रणाली) तयार केली जाईल. यामुळे नागपूरच्या नवीन टर्मिनल उभारणीतील सर्वात मोठा अडसर दूर झाला आहे."

पुण्यात सुरू असलेल्या MPSC विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी अत्यंत परखड आणि आक्रमक भूमिका मांडली. "विद्यार्थ्यांचे शिष्टमंडळ माझ्याकडे आले असता त्यांच्या पाचही प्रमुख मागण्या सरकारने तत्काळ मान्य केल्या. त्यांनी समाधान व्यक्त करून आंदोलन मागे घेत असल्याचे स्वतः लेखी दिले होते.

सॅटेलाइट निकषात सवलत; आणखी २० तालुक्यांचा समावेश

"केंद्राच्या नियमावलीतील सॅटेलाइट इमेजरीच्या निकषात काही तालुके बसत नसले, तरी पर्जन्यतुटीचा खंड आणि प्रत्यक्ष पीक नुकसानीचा विचार करून ट्रिगर-1 मधील 265 तालुक्यांसोबतच अतिरिक्त 20 बाधित तालुक्यांनाही दुष्काळी मदत लागू केली जाईल."

केंद्राची वाट न पाहता राज्य सरकार आधी मदत देणार

"केंद्राचा निधी येण्यास प्रशासकीय प्रक्रियेमुळे वेळ लागतो. मात्र, 2001 नंतर प्रथमच राज्य सरकारने सर्व जुने निकष बाजूला ठेवून नोव्हेंबर-डिसेंबरऐवजी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यातच दुष्काळ जाहीर केला आहे. 23 हजार गावांमधील पंचनामे पूर्ण झाले असून, उर्वरित काम संपवून राज्य शासन स्वतःच्या तिजोरीतून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात थेट आर्थिक मदत पोहोचवेल."

दादर–नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ एसटी बससेवेचा मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते शुभारंभ



अटलसेतू मार्गे प्रवाशांना थेट कनेक्टिव्हिटी

■ मुंबई (दै. संध्या)

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची मुंबईशी सार्वजनिक वाहतूक कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने सुरू करण्यात आलेल्या दादर–नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बससेवेचा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते प्रारंभ झाला. अटलसेतू मार्गे धावणाऱ्या या बससेवेमुळे दादरहून विमानतळापर्यंत प्रवाशांना थेट, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली आहे. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, "नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला एसटीच्या व्यापक सार्वजनिक वाहतूक जाळ्याशी जोडण्याच्या दृष्टीने ही बससेवा महत्वाची आहे. मुंबईतील प्रमुख वाहतूक केंद्र असलेल्या दादरहून थेट विमानतळापर्यंत सेवा सुरू झाल्याने विमानप्रवाशांसह सर्वसामान्य नागरिकांना मोठा फायदा होईल." विमानतळाची कनेक्टिव्हिटी वाढविण्यासाठी एसटीकडून बोरिवली–नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि स्वारगेट–नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या बससेवाही सुरू करण्यात आल्या आहेत. मुंबई, नवी मुंबई आणि पुणे या प्रमुख शहरांना विमानतळाशी जोडण्याच्या दृष्टीने या सेवांचा महत्वपूर्ण उपयोग होणार आहे. विमानतळापर्यंत सुरक्षित, सुलभ आणि विश्वासार्ह सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देण्यासाठी एसटी महामंडळाकडून आवश्यकतेनुसार आणखी बससेवा सुरू करण्यात येणार असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून आरोग्य नवोन्मेष व गुणवत्ता सुधारणेसाठी राज्यस्तरीय 'लिव्हिंग लॅब' विकसित

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या 'सर्वांसाठी आरोग्य' या ध्येयाला पूरक ठरणारी आरोग्य नवोन्मेष आणि गुणवत्ता सुधारणेसाठीची राज्यस्तरीय 'लिव्हिंग लॅब' विकसित होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या माध्यमातून आरोग्य सुविधांचा दर्जा आणि गुणवत्ता मानकांचे पालन सुधारण्यासह राज्यातील नागरिकांसाठी कौशल्य विकास व रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर सुद्धा भर देण्यात येणार आहे. स्थानिक आरोग्यविषयक प्राधान्यक्रम निश्चित करणे, समुदायांसोबत उद्देशानुरूप उपाय तयार करणे आणि प्रत्यक्ष आरोग्य व्यवस्थेत नव्या पद्धतींची चाचणी घेणे, हा या व्यासपीठाचा उद्देश आहे. शासन, आरोग्यसेवा प्रदाते, खासगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था, नवोन्मेषक आणि विकास भागीदारांचे अनुभव व क्षमता एका सामायिक व्यासपीठावर आणून सध्याची आरोग्य व्यवस्था आणि उपचार मार्ग अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न 'लिव्हिंग लॅब'च्या माध्यमातून करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा प्रयत्न आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल आरोग्य, डेटा आणि 'प्रिसिजन हेल्थ'सह नवोन्मेष व तंत्रज्ञानाच्या क्षमतांचाही यासाठी उपयोग केला जाणार आहे.

खासगी आरोग्य क्षेत्राची व्याप्ती व क्षमता सार्वजनिक आरोग्याच्या प्राधान्यक्रमांशी जोडणे, ही या उपक्रमातील महत्त्वाची संधी आहे. विविध भागधारकांच्या सहभागातून स्थानिक गरजांना प्रतिसाद देणारे व्यवहार्य, परवडणारे आणि सुलभ उपाय विकसित करता येतील. यशस्वी उपायांचा

समुदायांच्या गरजांवर आधारित उपायांची चाचणी



महाराष्ट्रासह अन्य ठिकाणीही विस्तार करण्याची क्षमता तपासली जाईल. उपक्रमाच्या पुढील टप्प्यांत समुदायाच्या आरोग्यविषयक गरजांशी निगडित स्थानिक कौशल्यविकास, रोजगार आणि उद्योगनिर्मितीच्या संधींचाही शोध घेतला जाणार आहे. केवळ नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याऐवजी दुर्गम व आरोग्यसेवेपासून वंचित घटकांसह प्रत्येक नागरिकापर्यंत नवोन्मेष पोहोचविण्यावर या संकल्पनेत भर आहे. शासन, समुदाय, नवोन्मेषक आणि भागीदारांच्या सहभागातून परिणामकारक उपायांची चाचणी, त्यातून मिळणाऱ्या अनुभवांचे वेगाने विश्लेषण आणि आरोग्यसेवेची गुणवत्ता व समानता सुधारणाऱ्या उपायांचा व्यापक विस्तार करण्याचे उद्दिष्ट आहे.

पुरावेनिर्मिती आणि सहकार्याचे व्यासपीठ म्हणून 'लिव्हिंग लॅब' विकसित केली जाणार आहे. समुदायाच्या गरजा आणि स्थानिक मालकी या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी ठेवून नवोन्मेष, आरोग्य व्यवस्था आणि प्रत्यक्ष सेवा देणाऱ्या घटकांमधील समन्वय अधिक मजबूत केला जाईल. 'द फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया'चा 'मान्यता' हा प्रमुख उपक्रम या दृष्टिकोनाचे प्रारंभिक उदाहरण आहे. मातृ आरोग्यसेवा बळकट करण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना पूरक असलेल्या या उपक्रमातून खासगी क्षेत्रातील गुणवत्ता सुधारणा प्रारूप सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसोबत कशा प्रकारे कार्य करू शकते, हे दिसून येते. 'एमएसडी फॉर मदर्स' या उपक्रमाचा समन्वय करीत असून, या सहयोगी प्रारूपाच्या विकासासाठी विविध भागीदारांचा समूह एकत्र आणत आहे. नवोन्मेषाचे व्यवहार्य व शाश्वत उपायांमध्ये रूपांतर करून व्यवस्था बळकट करण्यासाठी भागीदारीचा उपयोग केला जाणार आहे.

विजेटीआयच्या मुला-मुलींच्या नवीन वसतिगृहांना मंजुरी

पदभरतीला आठवडाभरात मान्यता; चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

■ मुंबई (दै. संध्या)

वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (विजेटीआय), मुंबई येथे मुलांचे व मुलींचे नवीन वसतिगृह उभारण्यास मंजुरी देण्यात आली असून, संस्थेतील पदभरतीच्या प्रस्तावास आठवडाभरात मान्यता देण्यात येईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

विजेटीआयच्या शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या विविध प्रस्तावांचा आढावा घेण्यासाठी मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ संचालक तथा तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ, उपसचिव अमोल मुत्याल, विजेटीआयचे अधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत संस्थेतील मुलांचे व मुलींचे नवीन वसतिगृह, पदभरती तसेच अन्य प्रलंबित प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करण्यात



आली. संस्थेच्या वाढत्या विद्यार्थी संख्येच्या अनुषंगाने नवीन वसतिगृहांची आवश्यकता लक्षात घेऊन त्यास मंजुरी देण्यात आली. तसेच पदभरतीबाबतचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. संस्थेच्या शैक्षणिक व प्रशासकीय गरजा लक्षात घेऊन आवश्यक पदे भरण्याच्या प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना मंत्री पाटील यांनी दिल्या. विजेटीआयला स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. यासंदर्भात संस्थेने शासनाकडे आवश्यक प्रस्ताव सादर करावा, अशी सूचना मंत्री पाटील यांनी केली.

विजेटीआय ही देशातील ऐतिहासिक आणि अग्रगण्य तंत्रशिक्षण संस्थांपैकी एक असून, १८८७ पासून महाराष्ट्राच्या तसेच देशाच्या औद्योगिकीकरणात संस्थेने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. संस्थेत सुमारे ५ हजार विद्यार्थी विविध पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेत आहेत. देशातील भारतीय तंत्रज्ञान संस्थांच्या तसेच प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या स्थापनेच्या प्रारंभीच्या काळातही विजेटीआयचा महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे.

तंत्रशिक्षणातील गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि मनुष्यबळ निर्मितीचा प्रदीर्घ वारसा असलेल्या विजेटीआयच्या पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी संस्थेच्या विकासाशी संबंधित प्रस्तावांवर प्राधान्याने कार्यवाही करण्यात येईल, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले.

'पीसीपीएनडीटी' कायद्यात सुधारणा विधेयक आणणार : प्रकाश आबिटकर

वारंवार गुन्हा करणाऱ्यांवर मोक्का लावणार; बोगस डॉक्टरांची यादी होणार प्रसिद्ध



■ मुंबई (दै. संध्या)

प्रसुतीपूर्व गर्भ लिंग निदान करून स्त्री भ्रुण हत्या करणा-या डॉक्टरांवर कठोर कारवाई होण्यासाठी गर्भधारणा पूर्व व प्रसुतीपूर्व निदानतंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ व २००३ मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. असे गुन्हे करणाऱ्या डॉक्टरांवर लावण्यात येणारे कलम अधिक कठोर करण्यासोबतच, गुन्हेगारांवर मोक्का लावणे, गुन्हे सिद्धता आणि शिक्षा यात बदल करणे आवश्यक असून येत्या हिवाळी अधिवेशनात या कायद्यात सुधारणा विधेयक सादर करण्यात येईल, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. गर्भधारणा पूर्व व प्रसुतीपूर्व निदानतंत्रे लिंग निवडीस प्रतिबंध कायदा १९९४ व २००३ च्या कठोर अंलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृती दलाची पहिली बैठक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली, यावेळी ते बोलत होते. यावेळी कृती दलाच्या अध्यक्ष आमदार डॉ. निलम गोऱ्हे, सदस्य आमदार मनीषा कायंदे, आमदार उमा खापरे, आणि आमदार स्नेहा दुबे – पंडीत व आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर उपस्थित होते.

संपादकीय

लोकशाहीत आत्मपरीक्षणाची संधी

सर्वसामान्य नागरिकांच्या मतांचा हक्क काढून घेणारी प्रक्रिया मनमानी असल्याचे परखड मत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश उज्वल भुयान यांनी व्यक्त केले आहे. त्यांचे हे मत म्हणजे सोनारानेच कान टोचल्यासारखे आहे. लोकशाही आपल्या राष्ट्रीय एकात्मतेची आणि स्वातंत्र्याची गौरव करणारी जननी मानली जाते. लोकशाहीचा हा उत्सव यशस्वी करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सक्रिय आणि उत्स्फूर्त सहभाग त्यामध्ये आवश्यक असतो.जात-पात धर्म वंश आणि स्वार्थाच्या पलीकडे जाऊन जेव्हा आपण देशाच्या हितासाठी विचार करतो तेव्हाच खऱ्या अर्थाने लोकशाहीचा हा सोहळा अधिकच उजळून निघतो. लोकशाहीत निवडणुका या केवळ मतदानाची प्रक्रिया नसते. ती नागरिकांच्या सार्वभौमत्त्वाची अभिव्यक्ती असते.त्यामुळे एखाद्या पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार कोणत्याही कारणाने हिरावला जात असेल तर तो प्रश्न केवळ प्रशासकीय म्हणून राहत नाही तर तो थेट लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारा ठरू शकतो. याच वास्तवाकडे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्वल भयान यांनी लक्ष वेधले आहे. अशा प्रकारे न्यायव्यवस्थेनेच निवडणूक व्यवस्थेचे कान टोचले असून ते समयोचित म्हणावे लागतील. गेल्या दोन वर्षात १३ कोटीहून अधिक भारतीय नागरिकांच्या मतदानाचा अधिकार हिरावून घेणारी कोणतीही प्रक्रिया मनमानी अन्यायकारक आणि घटनात्मक व्यवस्थेला नाकारणारी ठरू शकते. असे न्यायमूर्ती भुया यांनी स्पष्ट केले आहे. हे केवळ राजकीय आरोप प्रत्यारोप किंवा प्रशासकीय कारणे पुढे करून अशा प्रक्रियेचे समर्थन करता येणार नाही. ही भूमिका आजच्या परिस्थितीत अधिक महत्त्वाची ठरते.मतदानाचा अधिकार हा केवळ बोटावरची शाई नाही.ते सत्तेला प्रश्न विचारणाऱ्याचे सत्ताधाऱ्यांना बदलण्याची आणि लोकशाहीला त्या दिशेला आकार देण्याची नागरिकांच्या हातातील सर्वात प्रभावी माध्यम आहे. त्यामुळेच नागरिकांच्या हातातून मतदानाचा अधिकार काढून घेणे म्हणजे त्यांचा केवळ एक हक्क हिरावून घेणे. नव्हे तर त्यांचा लोकशाही प्रक्रियेतील आवाज दडपल्यासारखे होईल. राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला आहे. भारतीय लोकशाही नागरिकांचे दोन वर्ग मानत नाहीत एक मतदान करू शकणारे.आणि दुसरे मतदानापासून वंचित असलेले मग प्रशासकीय प्रक्रिया. कागदपत्राच्या मतदार यादीतील त्रुटी किंवा पडताळणीच्या नावाखाली मोठ्या संख्येने नागरिक मतदानापासूनच दूर जात व होत असतील तर त्याकडे केवळ तांत्रिक त्रुटी म्हणून पाहता येणार नाही.निवडणूक यंत्रणेतील अचूकता आणि पारदर्शकता नक्कीच आवश्यक आहे. मतदार यादी शुद्ध असावी. बोगस नावे वगळले जावीत आणि निवडणूक प्रक्रिया नि:पक्ष असावी याबाबत दुमत नाही. तथापि या प्रक्रियेत पात्र नागरिकच वगळले जाणार नाही. याची काळजी घेणे त्याहून महत्वाचे आहे.चुकीचे नाव. मयत नाव. अन्य ठिकाणी स्थलातंर झालेल्या मतदाराचे नाव यादीत राहणे ही एक समस्या आहे.पण पात्र नागरिकाचे नावच यादीतून गायब होणे ही लोकशाहीसाठी अधिक गंभीर समस्या आहे. दुर्बल. वंचित आणि व्यवस्थेच्या काठावर उभे असलेल्या नागरिकांचा अधिकार किती सुरक्षित राहिला यावरच लोकशाहीची खरी परीक्षा ठरते. कागदपत्राची कमतरता ओळख पटवण्याच्या प्रक्रियेतील त्रुटी किंवा प्रशासकीय निष्काळजीपणा यामुळे हजारो. लाखो.करोडो नागरिक मतदानापासून वंचित राहणार असतील तर व्यवस्थेने स्वतःच्या कार्यपद्धतीचा सर्वकष दृष्टीने विचार करायला हवा याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. आता देशभर निवडणूक व्यवस्थेतील सुधारणा करण्यासाठी तरुणाई आपल्या आंदोलनाच्या माध्यमातून आवाज उठवत आहे. व्यवस्थेला प्रश्न विचारत आहेत. निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक विश्वासार्ह आणि सर्वसमावेशक करण्याची मागणी करत आहेत. अशा वेळी सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती कडून घटनात्मक मूल्याची आठवण करून देणारा आवाज येणे हे काल- सुसंगतच आहे.लोकशाही केवळ निवडणुका घेण्याने जिवंत राहत नाही.प्रत्येक पात्र नागरिकाला त्या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाल्याने ती जिवंत राहते हे लक्षात घेणे आवश्यक आहे.सत्तेवर कोण आहे?कोणता पक्ष जिंकतो? किंवा कोणाचा पराभव होतो? हा लोकशाहीचा एक भाग आहे. पात्र मतदाराला प्रक्रियेपासून दूर केले गेले तर विजय पराजयाची संपूर्ण गणिते समस्येच्या संशयाच्या भोव-यात सापडतात. मतदाराचा विश्वास हा निवडणूक व्यवस्थेचा सर्वात मोठा आधार आहे. तोच ढासळला तर निवडणुकीचा निकाल कायदेशीर असला तरी लोकशाही वरील विश्वासाला तडा जाऊ शकतो. म्हणूनच न्यायमूर्ती उज्वल यांचे शब्द केवळ न्यायालयीन निरीक्षण म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. किंबहुना हे निवडणूक आयोग. प्रशासन. राजकीय पक्षाने. व प्रत्येक नागरिकांसाठी एक गंभीर आणि गर्भित इशारा आहे., मतदार यादी शुद्ध करण्याच्या प्रक्रियेत एकही पात्र नागरिक वगळला जाऊ नये. मतदानात मतदारच नसेल तर लोकशाहीचा हा उत्सव केवळ औपचारिक सोहळा ठरतो. म्हणूनच न्यायमूर्ती भयान यांनी टोचलेले कान हे केवळ निवडणूक व्यवस्थेचे नाहीत तर ते संपूर्ण लोकशाही व्यवस्थेचे आहेत. आता ही व्यवस्था बदलायची?का तशीच ठेवायची?याचे निवडणूक आयोग. प्रशासन विविध सत्ताधारी व विरोधी राजकीय पक्षाच्या आणि त्या राजकीय पक्षाच्या नेत्यांना आत्मपरीक्षण करण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे.

वाघीरे विद्यालयात रंगला प्रतिबिंबचा अभिवाचन स्वरुपातील दीर्घांक कार्यक्रम



■ सासवड (दै. संध्या)

सध्याच्या काळात माणसाची ओळख हरवल्याची भावना, त्याचे एकाकीपण स्वअस्तित्वाबद्दलचे विचार या विषयांना स्पर्श करणाऱ्या महेश एलकुंचवार लिखित व(पीडीए) म्हणजेच प्रोग्रेसीव्ह ड्रामॅटिक असोसिएशनच्या "प्रतिबिंब "या नाट्यकृतीचा अभिवाचन कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. एमईएस संस्थेच्या सासवड येथील वाघीरे विद्यालयातील आचार्य अत्रे सभागृहात वाचू आनंदे वाचन कट्टा, पुरंदर कलामंच, महाराष्ट्र साहित्य परिषद सासवड शाखा व आचार्य अत्रे वाचन कट्टा यांच्या वतीने या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते पुण्यातील प्रतिथयश अशा अजित सातभाई, वीणा फडके, संजय गोसावी व केतकी फडके या अभिवाचक मंडळींनी याचे अत्यंत प्रभावी व नेटके वाचन करत उपस्थितांच्या टाळ्या घेतल्या. सोबतीला दिलीप वेंगुर्लेकरांच्या संगीतसाथीने कार्यक्रम उत्तम झाला. वाचन कट्ट्याच्या शलाका गोळे यांनी प्रास्तविकातून कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल माहिती दिली तर संजय काटकर यांनी सर्वं उपस्थितांचे आभार व्यक्त केले. डॉ संध्या खळदकर, इंदिरा पवार, अँड दिलीपराव निरगुडे कवी अनिल कदम व सुनील हेंद्रे यांनी अभिवाचकांचे पुष्पगुच्छ व प्रतिमा भेट देवून स्वागत केले. माणसाच्या अस्तित्व व एकाकीपणाची वाढती भावना, स्वतःची ओळख हरवत असल्याची खंत या व यासारख्या भावनिक विषयांची उत्तम संवादफेक करत, संगीताच्या समर्पक साथीने हा कार्यक्रम रसिकांच्या पसंतीला उतरला. मी मज हरपुन बसले ग या गीताने अभिवाचनाची सांगता झाली अमोल बागडे, स्नेहल देशपांडे, कल्याणी चिंबळकर, गीता पुरंदरे, सतीश निरगुडे, हेमंत ताकवले, संजय जाधव रेश्मा कामठे, संजय प्रभुणे, प्रतिभा पुरंदरे, राजाराम यादव सयाजी वांढेकर, शिल्पा हेंद्रे, राजेंद्र कांबळे, उत्तम मोरे, राजनंदिनी ताकवले ऋतुजा राऊत, रेखा चौधरी, गणेश बागडे, अश्विनी वांढेकर, मीना जोशी, उमा पांडकर,इंदुमती दाते, किशोरी गुरव यांसह अनेक साहित्यप्रेमी या प्रसंगी उपस्थित होते.



श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर वाहतूक कोंडी

बुधवारच्या आठवडे बाजारामुळे समस्या गंभीर

■ लासुर्णे (दै. संध्या)

बारामती - इंदापूर मार्गावरील लासुर्णे गावातून जाणाऱ्या श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम अद्याप पूर्ण झालेले नसल्याने वाहतुकीची समस्या कायम आहे. या परिसरात चारपदरी रस्त्याचे काम पेंडिंग असल्याने सध्या या मार्गावर एकेरी वाहतूक सुरू आहे. त्यातच दर बुधवारी लासुर्णे येथे आठवडे बाजार भरत असल्याने वाहतुकीच्या समस्येत आणखी भर पडत आहे. रस्त्यालगतच बाजार भरत असल्यामुळे विक्रेते, ग्राहक आणि वाहनांची मोठी गर्दी होते. एकेरी वाहतूक आणि रस्त्यालगतचा आठवडे बाजार यामुळे बुधवारी या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून, वाहनचालक व नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावरील रखडलेले काम लवकरात लवकर पूर्ण करावे, तसेच बुधवारच्या आठवडे बाजाराच्या दिवशी वाहतूक सुरळीत राहण्यासाठी प्रशासनाने स्वतंत्र वाहतूक नियोजन करावे, अशी मागणी ग्रामस्थ व वाहनचालकांकडून होत आहे.

दुष्काळाच्या झळा; भाद्रपद बैल पोळ्यासाठी दुकाने सज्ज

■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई व बेट भागातील अनेक गावात भाद्रपद महिन्यातील पारंपरिक बैलपोळा सण काही दिवसांवर येऊन ठेपला असून, ग्रामीण भागातील बाजारपेठांमध्ये बैलांच्या सजावटीचे साहित्य, रंग, झुली, गोंडे, शिंगासाठीचे रंग, विविध पूजासाहित्य आदींची दुकाने सज्ज झाली आहेत. मात्र यंदा पावसाने पाठ फिरवल्याने बाजारपेठेत अपेक्षित खरेदीचा उत्साह दिसत नसून अनेक ठिकाणी शुकशुकाट जाणवत आहे. त्यामुळे व्यापारी वर्गाबरोबरच शेतकरीही चिंतेत असल्याचे चित्र पाहावयास मिळत असल्याचे कवठे येमाई येथील व्यापारी रविकिरण नेवासकर यांनी व्यक्त केली आहे. बैलपोळा हा शेतकरी आणि पशुधनाच्या जिव्हाळ्याचा सण. या दिवशी शेतकरी आपल्या बैलांची पूजा करून त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करतो. त्यामुळे दरवर्षी पोळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण बाजारपेठांमध्ये मोठी आर्थिक उलाढाल होत असते. मात्र यंदा पावसाअभावी शेतीचे अर्थकारणच अडचणीत आल्याने सणाच्या



खरेदीवरही त्याचा थेट परिणाम जाणवत असल्याचे नेवासकर यांनी सांगितले. याबाबत बाजारपेठेतील दुकानदार रविकिरण नेवासकर यांनी चिंता व्यक्त करताना सांगितले की, "बैलपोळ्यासाठी दुकानात मोठ्या अपेक्षेने माल भरला आहे. मात्र ग्राहकांची संख्या आणि खरेदीचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे दिसत नाही. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसेल तर बाजारपेठेत उलाढाल कशी होणार?" अशी व्यथा त्यांनी व्यक्त केली.

निसर्गाच्या लहरीपणामुळे पुरंदरचा बळीराजा पुरता कोलमडला

उत्पन्न निम्म्यावर, मजुरी गगनाला : बाजरी पिकाच्या काढणीवरून शेतकरी हैराण

■ वाल्हे (दै. संध्या)

यंदाच्या खरीप हंगामात पुरंदर तालुक्यातील बाजरी उत्पादक शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकटाची मालिकाच उभी ठाकली आहे. एकीकडे पावसाने पाठ फिरवल्याने पिकांची अर्धवट वाढ झाली असून पीक काढणीच्या वेळी मजुरांचे वाढलेले दर आणि पक्षांचा उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे उरलेसुरले गणितही कोलमडले आहे.

यावेळी पुरंदर तालुक्यातील वाल्हे सह आडाचीवाडी, पिंगोरी, दौंडज, पिसुर्टी, वागदरवाडी , सुकलवाडी राख नावळी हरणी आदी बाजरी उत्पादक पट्ट्यांमध्ये सध्या बाजरी पिकाची कापणी व मळणीच्या कामांनी वेग घेतला आहे. मात्र, शेतातील चित्र अत्यंत चिंताजनक असून पावसाअभावी कणसे नीट भरली नसल्याने उत्पादनात मोठी घट उघडपणे दिसत आहे.

अशातच महिला मजुरांचे रोजंदारीचे दर प्रतिदिन ४०० ते ५०० रुपयांवर पोहोचले असताना देखील काढणीसाठी मजूरच वेळेवर मिळत नसल्याने उत्पादक शेतकरी पुरता हैराण झाला आहे. त्यातच मजूर मिळेपर्यंत शेतात उभ्या असलेल्या



"पावसाने मारलेल्या दडीमुळे कोरडवाहू क्षेत्रातील बाजरीची वाढ पूर्णपणे थांबल्याने उत्पादनात प्रचंड घट झाली आहे. त्यातच काढणीच्या काळात मजुरांची टंचाई निर्माण झाल्याने पाखरांपासून पिकाचे रक्षण करणे अवघड बनले आहे."
— शंकर पवार बाजरी उत्पादक शेतकरी (अंबाजीची वाडी)

कणसांवर पाखरांचे थवे दरोडा टाकत असून दाण्यांचे अतोनात नुकसान करत असल्याचे शेतकऱ्यावर दुहेरी संकट निर्माण झाले आहे . कमी पाऊस, घटलेले उत्पन्न, वाढलेला उत्पादन खर्च आणि पक्षांचा उपद्रव या सर्व घटकांमुळे यंदा बाजरीची शेती शेतकऱ्यांच्या खिशाला मोठी कात्री लावणारी ठरली आहे.

निरा भीमाचे ६ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट

हर्षवर्धन पाटील : गळीत हंगाम शुभारंभ संपन्न

■ इंदापूर (दै. संध्या)

चालु ऊस गळीत हंगाम दुष्काळाच्या पार्श्वभूमीवरती होत असल्याने, आपणा सर्वांना हा हंगाम एकजुटीने जास्तीत जास्त गाळप करून यशस्वी करावयाचा आहे. निरा भीमा कारखान्याचे चालू गळीत हंगामामध्ये 6 लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट असल्याची माहिती राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व कारखान्याचे संस्थापक हर्षवर्धन पाटील यांनी सोमवारी (दि. 5) दिली. शहाजीनगर (ता. इंदापूर) येथील निरा भिमा सहकारी साखर कारखान्याचा सन 2026-27 च्या 26 व्या ऊस गळीत हंगामाचा बॉयलर अग्नी प्रदीपन तसेच गळीत हंगामाचा शुभारंभ राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, कारखान्याचे संस्थापक हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते साधेपणाने संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखान्याच्या अध्यक्षा सौ.भाग्यश्री पाटील होत्या. हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, तीव्र दुष्काळी संकटाचा फटका हा साखर उद्योगाला चालू वर्षीचा गळीत हंगाम व पुढील वर्षीच्या गळीत हंगाम असा सलग 2 गळीत हंगामात बसेल, अशी चिन्हे दिसत आहेत. दुष्काळामध्ये पाणी टंचाईचे संकट मोठे असून, गांभीर्याने सर्वांनी एकत्र येत पाऊले उचलावी लागणार आहेत. साखर उद्योगाला दिलासा मिळावा याकरिता आंम्ही केंद्र सरकारकडे साखरेची किमान विक्री किंमत (एम.एस.पी.) प्रति किलोस रु. 50 करावी अशी मागणी केली आहे. तसेच दुष्काळामुळे उसाचे उत्पन्न (टनेज) घटणार असून, साखर उताराही कमी येणार असल्याने सरकारने गाळप होणाऱ्या उसास प्रति टन रु.1 हजार अनुदान द्यावे, अशी मागणीही केली आहे. तर सरकारने राज्यातील साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन मंजूर केलेबद्दल हर्षवर्धन पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रावाहिनी पवार यांचे आभार व्यक्त केले. दुष्काळामुळे चालू गळीत हंगाम कमी कालावधीचा हंगाम असणार आहे, त्यामुळे



ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊस तोडसाठी गडबड करू नये. चालू हंगामामध्ये कारखाना ऊस दरामध्ये मागे राहणार नाही, तसेच वेळेवरती ऊस बिल अदा केले जाईल. हार्वेस्टिंग प्रोग्रॅमप्रमाणे शेतकऱ्यांच्या सर्व उसाचे गाळप केले जाणार असून, निरा भीमा कारखान्यास सर्व ऊस देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही याप्रसंगी बोलताना हर्षवर्धन पाटील यांनी केले. यावेळी बॉयलर अग्नि प्रदीपन निमित्ताने सत्यनारायण पूजा संचालक सुभाष गायकवाड सर व उज्वला गायकवाड या उभयतांच्या हस्ते करण्यात आली. तर गव्हाण पूजन व काटा पूजन संचालक विजयराव घोगरे व लतिका घोगरे या उभयतांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक नवनाथ सपकाळ यांनी केले. या कार्यक्रमास माजी अध्यक्ष लालासाहेब पवार, विलासराव वाघमोडे, उदयसिंह पाटील, अँड.कृष्णाजी यादव, शिवाजी हांगे, दत्तू सवासे, प्रतापराव पाटील, प्रकाश मोहिते, संजय बोडके, राजकुमार जाधव, विजय घोगरे, सुभाष गायकवाड, राजेंद्र देवकर, उमेश पाटील, महेशकुमार शिर्के, आनंदराव बोंद्रे, रामचंद्र नाईक, राहुल कांबळे, संगिता पोळ, कल्पना शिंदे तसेच जयकुमार कारंडे, कांतीलाल झगडे, विकास पाटील, दत्तात्रय शिर्के, धनंजय कोरटकर, राजेंद्र कोरटकर, शरद जगदाळे, विक्रम कोरटकर, अजित खबाले, अमरदीप कळकुटे, राजेंद्र गायकवाड, लक्ष्मण आसबे, अँड.अनिल पाटील, सुरेश मेहेर, सुरेश जगदाळे, महावीर गांधी, दत्तात्रय अनपट, निवृत्ती शिंदे, मनोज मोरे, चंद्रकांत भोसले, अशोक शिंदे, हरिभाऊ घोगरे, दयानंद गायकवाड, रणजित गिरमे, माणिक खाडे, एच. के. चव्हाण, सतीश अनपट आदींसह ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदार, अधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन कालिदास आवाड तर आभार उपाध्यक्ष दादासाहेब घोगरे यांनी मानले.

नारायणगाव महाविद्यालयात कला शाखेच्या विद्यार्थ्यांचा मेळावा

■ नारायणगाव (दै. संध्या)

ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव येथील कला शाखेच्या माजी विद्यार्थ्यांचा विशेष मेळावा रविवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी व माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत फुलसुंदर यांनी ही माहिती दिली. ग्रामोन्नती मंडळाच्या या नामांकित महाविद्यालयाच्या स्थापनेला आता ३३ वर्षे पूर्ण झाली आहेत. या तीन दशकांहून अधिक काळाच्या शैक्षणिक प्रवासात महाविद्यालयातून हजारो विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले असून आज ते विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत. अनेक वर्षांनंतर जुन्या मित्रांना आणि गुरूंना पुन्हा भेटण्याची, तसेच महाविद्यालयाच्या आठवणींना उजाळा देण्याची सुवर्णसंधी या मेळाव्याच्या निमित्ताने उपलब्ध झाली आहे. त्यामुळे या उपक्रमाला माजी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या महाविद्यालयात कला शाखेत शिकलेल्या माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष अनिल मेहेर यांनी केले आहे. १९९३ ते २०२५ या शैक्षणिक कालावधीत कला शाखेतून बी.ए. व एम.ए.चे शिक्षण पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांनी या मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्यासाठी महाविद्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य कुलकर्णी व माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष फुलसुंदर यांनी केले आहे.

मेळाव्याच्या आयोजनाबाबत अधिक माहितीसाठी कला शाखेतील विषय विभाग प्रमुख डॉ. मिलिंद कसबे, डॉ.शरद काफले,प्रा. आकाश कांबळे, डॉ. दिलीप शिवणे, डॉ. विनायक कुटे, डॉ.राहुल गोंगे, डॉ.उत्तम पठारे, डॉ. अनिल काळे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी व प्रा. डॉ. श्रीकांत फुलसुंदर यांनी केले आहे.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.



'एईएसए'च्या अध्यक्षपदी शेखर गरुड यांची निवड

चेअरमनपदी आर्कि. महेश बांगड, सचिवपदी आर्कि. अलोका काळे

■ पुणे (दै. संध्या)

आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशनच्या (एईएसए) अध्यक्षपदी आर्कि. शेखर गरुड, तर मानद सचिवपदी आर्कि. अलोका काळे यांची निवड करण्यात आली. चेअरमनपदी आर्कि. महेश बांगड, उपाध्यक्षपदी आर्कि. संजय तासगावकर, खजिनदारपदी अभियंता नितीन भोळे, मानद सहसचिवपदी आर्कि. मनाली महाजन व आर्कि. आनंद कुंकुलोळ यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून आर्कि. निनाद जोग, अभियंता जयंत पटवर्धन, आर्कि. रमा वेलणकर, आर्कि. जान्हवी पाटील, आर्कि. अभया बाभुळकर आणि अभियंता अमेय वाळवेकर यांचा कार्यकारिणीत समावेश आहे.

जागतिक वास्तुकला दिनानिमित्त २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी निवडलेल्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ, तसेच शिक्षक दिन सोहळा नुकताच पार पडला. 'एईएसए'च्या वतीने वास्तुकला आणि अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या चार शिक्षकांचा विशेष गौरव करण्यात आला. यामध्ये वास्तुविशारद प्रा. प्रसन्न देसाई, वास्तुविशारद प्रा. श्रीकांत भाटे, नागरी अभियांत्रिकी शिक्षणातील योगदानाबद्दल प्रा. समीर शास्त्री आणि प्रा. अनिता बेनिंजर-गोखले यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे विश्वस्त आर्कि. दिवाकर निमकर, आर्कि. विश्वास कुलकर्णी, आर्कि. जयंत इनामदार, नवनिर्वाचित अध्यक्ष आर्कि. शेखर गरुड, मावळते अध्यक्ष आर्कि. राजीव राजे यांच्यासह वास्तुविशारद, अभियंते, प्राध्यापक आणि बांधकाम क्षेत्रातील विविध व्यावसायिक उपस्थित होते.

अभियंता शिवदत्त पाटणे यांनी आपल्या व्यावसायिक प्रवासाची आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील कामाची माहिती दिली. आर्कि. शितेश अग्रवाल यांनी वास्तुरचनेतील विविध संकल्पना, डिझाइनविषयक दृष्टिकोन आणि प्रत्यक्ष कामातील अनुभव सांगितले. कार्यक्रमात बंगळुरू येथील ज्येष्ठ वास्तुविशारद कृष्णराव जैसिम यांच्या कार्यावर आधारित ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. या ग्रंथाचे लेखक डॉ. आनंद गोपाल नाईक यांनी ग्रंथाची ओळख करून देत जैसिम यांचा वास्तुकलेतील प्रवास, त्यांची महत्त्वाची कामे आणि वास्तुरचनेविषयी सांगितले.

आर्कीटेक्ट महेश बांगड यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. मागील दोन वर्षात झालेले कार्यक्रम, संस्थेनी घेतलेले उपक्रम यांचा आढावा त्यांनी यावेळी घेतला. संस्थेचा विस्तार, स्पर्धा यांविषयी माहिती दिली. तर अध्यक्षपदी निवड झालेल्या शेखर गरुड यांनी नव्या जबाबदारीबद्दल आनंद व्यक्त करत येत्या काळात आपण संस्था आणि सदस्यांच्या विकासासाठी योगदान देणार असल्याचे सांगितले.

पुरस्कार मिळालेल्या प्रा. प्रसन्न देसाई, प्रा. श्रीकांत भाटे, प्रा. समीर शास्त्री आणि प्रा. अनिता बेनिंजर-गोखले यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर्कि. अभया बाभुळकर व आर्कि. रमा वेलणकर यांनी केले तर आभार अलोका काळे यांनी मानले.

रुग्ण हक्क परिषदेने समाजात सर्वधर्मसमभावाची शिकवण पेरली

माजी संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांचे प्रतिपादन; ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशनचा तिसरा वर्धापन दिन उत्साहात



■ पुणे (दै. संध्या)

"आरोग्यसेवा ही केवळ उपचार करण्याची प्रक्रिया नसून, ती समाजाच्या संवेदनशीलतेची कसोटी आहे. रुग्णाला केंद्रस्थानी ठेवून आरोग्यव्यवस्थेकडे पाहण्याची गरज आज अधिक तीव्र झाली आहे," असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत व माजी संमेलनाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. रुग्ण हक्क परिषदेने समाजामध्ये सर्वधर्मसमभावाची शिकवण पेरल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशनच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. सबनीस बोलत होते. यावेळी रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण, इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्राचे माजी अध्यक्ष डॉ. अविनाश भोंडवे, माजी विशेष पोलिस महानिरीक्षक चंद्रशेखर दैठणकर, माजी सहाय्यक पशुवैद्यकीय आयुक्त डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण, माजी सहाय्यक पोलीस आयुक्त भानुप्रताप बर्गे, मिलिंद गायकवाड, जानमहम्मद पठाण, रुग्ण हक्क परिषदेच्या पुणे शहराध्यक्ष अपर्णा मारणे-साठे, ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशनचे कार्यकारी संचालक अशोक शिंदे, मुकेश मोहिते आदी उपस्थित होते.

डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, "रुग्ण हक्क परिषदेने सामाजिक कार्याच्या माध्यमातून सर्वधर्मसमभाव आणि माणुसकीची शिकवण समाजात पेरली आहे. आरोग्याच्या प्रश्नांसोबत सामाजिक बांधिलकी जपत विविध घटकांना एकत्र आणण्याचे काम परिषद करीत आहे, साहित्य आणि आरोग्य या दोन्ही क्षेत्रांचा संवाद समाजात सकारात्मक परिवर्तन घडवू शकतो. त्यामुळे आरोग्य साहित्य संमेलनाच्या माध्यमातून वैचारिक आणि सामाजिक चळवळीला नवी दिशा मिळेल."

यावेळी डिसेंबरमध्ये होणाऱ्या दुसऱ्या आरोग्य साहित्य संमेलनाची, तसेच संमेलनाध्यक्षपदी डॉ. अविनाश भोंडवे यांची निवड झाल्याची घोषणा करण्यात आली. डॉ. भोंडवे यांनी वैद्यकीय सेवेसह आरोग्य व इतर विषयावर २४ हून अधिक पुस्तकांचे लेखन केले आहे.

उमेश चव्हाण म्हणाले, "रुग्णांच्या हक्कांसाठी लढताना आम्ही केवळ आरोग्याचा प्रश्न हाताळत नाही, तर प्रत्येक नागरिकाला न्याय आणि सन्मान मिळावा यासाठी काम करीत आहोत. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा आणि रुग्णांच्या हक्कांची जाणीव पोहोचवणे हे आमचे ध्येय आहे. आगामी काळात सामाजिक एकोपा आणि मानवतावादी विचार अधिक व्यापक करण्यासाठी परिषद काम करेल."

भानुप्रताप बर्गे म्हणाले, "रुग्ण हक्क परिषदेचे कार्य हे सामाजिक जाणीव आणि आरोग्यसेवा यांचा सुंदर समन्वय साधणारे आहे. अशा उपक्रमांमुळे समाजातील विविध घटकांमध्ये परस्पर विश्वास आणि सहकार्याची भावना मजबूत होते."

यावेळी चंद्रशेखर दैठणकर यांच्या हस्ते ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशनच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सन्मान करण्यात आला. अशोक शिंदे यांनी प्रास्ताविक केले. दीपक म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

थोडक्यात पण महत्वाचे



आशियाई स्पर्धेत पदक मिळविणाऱ्या पुण्याच्या प्रिथिका प्रदीपचा सत्कार

पुणे : दैनिक संध्या

आशियाई स्पर्धेत पदक मिळविणाऱ्या पुण्याच्या प्रिथिका प्रदीप हिचा क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे विभागाचे उपसंचालक क्रीडा व युवक सेवा कार्यालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने चिखली येथील गणेश इंटरनॅशनल स्कूल येथे सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनीही प्रिथिका प्रदीप हिचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना प्रिथिका प्रदीप म्हणाली, "सातत्य आणि नियोजनबद्ध तयारीच्या माध्यमातून यश मिळविता येते. खेळाडूंनी ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत." क्रीडा व युवक सेवा विभागाचे उपसंचालक युवराज नाईक यांनी प्रिथिका प्रदीप हिचे अभिनंदन केले. ते म्हणाले, प्रिथिकाने मिळविलेल्या यशामुळे देशाचे नाव उंचावले आहे. विद्यार्थ्यांनी व खेळाडूंनी तिचा आदर्श घेऊन क्रीडा क्षेत्रात प्रगती साधावी. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंसाठी शासनाच्या विविध योजना आहेत. खेळाडूंनी या योजनांचा लाभ घ्यावा. 'मिशन लक्षवेध'सारख्या योजनांचा खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरीसाठी लाभ होऊ शकतो. शासनाकडून पात्र खेळाडूंना नोकरी तसेच विविध आर्थिक लाभ देण्यात येतात, असे त्यांनी सांगितले. पिंपरी-चिंचवडचे उपायुक्त पंकज पाटील म्हणाले, खेळाडूंनी प्राथमिक स्तरापासूनच यशस्वी खेळाडूंचा आदर्श घेऊन आपल्या क्रीडा कामगिरीत सातत्याने सुधारणा करावी. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आयुक्त दीपक सिंगला यांनी प्रिथिका प्रदीप हिचे अभिनंदन करून तिने आगामी काळात ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. "ऑलिम्पिकचे ध्येय निश्चित करून तयारी करा. शासन खेळाडूंच्या पाठीशी आहे. पात्र खेळाडूंना शासनाच्या नियमानुसार नोकरी व विविध आर्थिक लाभ देण्यात येतात," असे त्यांनी सांगितले.

फळपीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

पुणे : दैनिक संध्या

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना आंबिया बहार सन 2026- 27 करिता द्राक्ष, मोसंबी, केळी, पपई, नारळ, संत्रा, अंजीर, आंबा व डाळिंब या पिकांसाठी सहभागी होण्यासाठी https://www.pmfby.gov.in या राष्ट्रीय पीक विमा पोर्टलवर विहित मुदतीत अर्ज करावेत, असे आवाहन विभागीय कृषि सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी केले आहे. ही योजना पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यात भारतीय कृषि विमा कंपनी लि. मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी द्राक्ष पिकासाठी 15 ऑक्टोबर, केळी, मोसंबी, पपई, नारळ पिकासाठी 31 ऑक्टोबर, संत्रा, अंजीर पिकासाठी 30 नोव्हेंबर, आंबा पिकासाठी 31 डिसेंबर 2026 व डाळिंब पिकासाठी 14 जानेवारी 2027 याप्रमाणे अंतिम मुदत राहील. ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. या योजनेत गारपीट या हवामान धोक्यासाठीचा सहभाग ऐच्छिक असून त्यासाठी अतिरिक्त विमा हप्ता आहे. कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होणार आहेत किंवा नाही याबाबत घोषणापत्र अंतिम मुदतीच्या सात दिवस अगोदर भरुन देणे आवश्यक राहील. योजनेत सहभाग नोंदवण्यासाठी अधिसूचित फळबागांचे प्रती शेतकरी कमीत कमी 20 गुंठे व सर्व फळपिकांचे मिळून जास्तीत जास्त 4 हेक्टर इतके उत्पादनक्षम क्षेत्र मर्यादा आहे. एका फळपिकासाठी एका वर्षात एकाच क्षेत्रावर मृग अथवा आंबिया बहारापैकी एकाच हंगामाकरिता विमा संरक्षणासाठी अर्ज करता येईल.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या अधिकृत उमेदवार; विधानभवनात शक्तीप्रदर्शनाने अर्ज दाखल

■ पुणे (दै. संध्या)

पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतर्फे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) अधिकृत उमेदवार सौ. हर्षदा देशमुख-जाधव यांनी आज (६ ऑक्टोबर) पुणे विधानभवन येथे भव्य शक्तीप्रदर्शनात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. पदवीधरांच्या प्रश्नांवर केवळ आश्वासने न देता, ठोस कृतीचा अजेंडा घेऊन निवडणूक रिंगणात उतरल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

उमेदवारी अर्ज दाखल करताना महाविकास आघाडीतील विविध घटकांमधील प्रमुख नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, ज्येष्ठ नेते जयंत पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मोहन जोशी, आमदार सतेज (बंटी) पाटील, आमदार विश्वजीत कदम, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी महापौर अंकुश काकडे, माजी सनदी अधिकारी प्रभाकर देशमुख, काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष वसंत मोरे, तसेच के. जे. इन्स्टिट्यूटचे संस्थापक कल्याण जाधव यांच्यासह महाविकास आघाडीचे विविध नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांच्या हस्ते संकल्पनामा प्रकाशित करण्यात आला.



अर्ज दाखल केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना हर्षदा देशमुख-जाधव म्हणाल्या, "पदवी ही केवळ कागदी प्रमाणपत्रापुरती मर्यादित राहू नये. त्यातून रोजगार, नवीन कौशल्ये आणि संधींची नवी दिशा निर्माण झाली पाहिजे. ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक पदवीधराला समान संधी मिळावी हाच माझ्या कामाचा मुख्य केंद्रबिंदू असेल."

हर्षदा देशमुख-जाधव यांनी 'ड्रीम सोशल फाउंडेशन'च्या माध्यमातून शिक्षण, महिला सक्षमीकरण, 'स्मार्ट गर्ल' उपक्रम, आरोग्य आणि पर्यावरण (वृक्ष माझा सखा) या क्षेत्रांत तळागाळात काम केले आहे. तसेच, ट्रिनिटी शिक्षण संस्था आणि रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्य म्हणून प्रदीर्घ अनुभवाचा उपयोग शिक्षण आणि उद्योगांमधील अंतर कमी करण्यासाठी, तसेच युवकांना बदलत्या बाजारपेठेनुसार रोजगाराभिमुख बनवण्यासाठी करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पदवीधरांचे प्रश्न विधान परिषदेत प्रभावीपणे मांडून त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे सक्षम प्रतिनिधित्व देण्याचा शब्द त्यांनी यावेळी पुणे विभागातील मतदारांना दिला. उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने आता पुणे पदवीधर मतदारसंघातील प्रचाराची रणधुमाळी खऱ्या अर्थाने तापणार असल्याचे दिसून येत आहे.

'दृष्टीदूत' डॉ. अनिल दुधभाते यांना मराठवाडा युवा मंचचा वैद्यकीय पुरस्कार

■ पुणे (दै. संध्या)

वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, रुग्णसेवेतील सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेत मराठवाडा युवा मंचतर्फे यंदाचा प्रतिष्ठेचा वैद्यकीय पुरस्कार प्रख्यात नेत्रतज्ज्ञ डॉ. अनिल दुधभाते यांना प्रदान करण्यात आला. पुण्यात झालेल्या कार्यक्रमात त्यांच्या नेत्रसेवेतील बहुआयामी कार्याचा गौरव करण्यात आला.

एम.बी.बी.एस., एम.एस., एफ.सी.पी.एस. या उच्च शैक्षणिक पात्रतेसोबत वैद्यकीय कौशल्य आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करीत डॉ. दुधभाते यांनी नेत्रसेवेच्या क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आजवर त्यांनी एक लाखांहून अधिक यशस्वी नेत्रशस्त्रक्रिया केल्या असून, सहा लाखांपेक्षा अधिक रुग्णांवर उपचार केले आहेत. त्यांच्या उपचारातून अनेक रुग्णांच्या आयुष्यात पुन्हा दृष्टीचा प्रकाश आला आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू रुग्णांपर्यंत नेत्रसेवा पोहोचावी, या उद्देशाने त्यांनी एक हजारांहून अधिक मोफत नेत्रशिबिरांचे आयोजन केले आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रिया, विविध नेत्रविकारांवरील उपचार तसेच अत्याधुनिक नेत्रसेवेबरोबरच नेत्रदान चळवळीला प्रोत्साहन देण्याचे कार्यही त्यांनी सातत्याने केले आहे.

अत्याधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटरच्या माध्यमातून रुग्णकेंद्री नेत्रसेवेचा विस्तार करण्यात आला आहे. उपचारांसोबतच सर्वसामान्यांमध्ये नेत्रआरोग्याबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने त्यांनी 'नेत्रकोष' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाचे मे महिन्यात मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन झाले.



दुष्काळात शेतीला संजीवनी; प्रत्येक जिल्ह्याला नवीन १ हजार रोहित्र मंजूर

राज्य शासनाकडून अभूतपूर्व निर्णय; बळीराजाला दिलासा; विशेष निधीद्वारे शेतीसाठी अखंडित वीजपुरवठा होणार

■ पुणे (दै. संध्या)

राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमध्ये बळीराजाला मोठा दिलासा देणारा अभूतपूर्व निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. वितरण रोहित्र, 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' आणि 'कॅपॅसिटर बँक' खरेदी करण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यासाठी तब्बल २० कोटी रुपयांपर्यंतचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रस्तावाला मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने मंगळवारी (दि. ६) मंजुरी दिली. या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी आणि ग्रामीण भागात योग्य दाबाने सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेच्या सक्षमीकरणाचे कामे युद्धपातळीवर सुरु होणार आहेत.

यंदाच्या कमी पर्जन्यमानामुळे महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी तब्बल २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली आहे. महावितरणकडून राज्यात सुमारे ४७ लाखांवर कृषी ग्राहकांना विविध क्षमतेच्या वितरण रोहित्रांद्वारे वीजपुरवठा केला जात आहे. दुष्काळी परिस्थितीत हा वीजपुरवठा सुरळीत आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम राहणे आवश्यक असल्याने राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात वीज यंत्रणा सक्षम करण्याचे आदेश दिले आहेत. राज्य शासनाने मंजूर केलेल्या विशेष निधीच्या माध्यमातून तीन महत्वाचे कामे तातडीने करण्यात येणार आहेत. यामध्ये आवश्यकतेनुसार नवीन वितरण रोहित्रांची (ट्रान्सफॉर्मर्स) खरेदी केली जाईल. त्याद्वारे अतिभारित (ओव्हरलोड) किंवा नादुरुस्त रोहित्र बदलून सिंचनातील अडथळे दूर करण्यात येतील. यासोबतच कृषी वीजवाहिनीवर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांना आणि शेतातील घरांना २४ तास सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यकतेनुसार सिंगल फेज आणि थ्री-फेजचे नवीन 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' (एसडीटी) खरेदी करून ते बसवले जाणार आहेत. तसेच लांब अंतराच्या वीजवाहिन्यांवर कमी दाबाने (लो-व्होल्टेज) वीजपुरवठा होण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी मात करून योग्य दाबाने व दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यकतेनुसार नवीन कपॅसिटर बँकेची खरेदी करण्यात येणार आहेत.



वीजयंत्रणेच्या या सर्व कामांची युद्धपातळीवर अंमलबजावणी व्हावी यासाठी महावितरणच्या संबंधित अधीक्षक अभियंता कार्यालयामार्फत सर्व तांत्रिक बाबींची तात्काळ तपासणी केली जाणार आहे. वीजयंत्रणेच्या स्थानिक गरजांनुसार आवश्यक अंदाजपत्रके तयार करून ती तत्परतेने संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांचे नुकसान टळावे आणि पिकांना वेळेवर पाणी देता यावे यासाठी या अंदाजपत्रकांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तातडीने प्रशासकीय मान्यता प्रदान केली जाईल. या कामांच्या मान्यतेचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच या योजनेअंतर्गत मंजूर व वितरित निधीच्या विनियोगाचा अहवाल महावितरणच्या अधीक्षक अभियंता कार्यालयाकडून विहित कालावधीत जिल्हाधिकाऱ्यांना सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या या धोरणात्मक व धडाडीच्या निर्णयामुळे दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच ग्रामीण भागातील महावितरणच्या वीजयंत्रणेला देखील नवी ताकद मिळणार आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



स्मिथ अँड जोन्सने अभिनेत्री रसिका दुगलसोबत सुरु केलेनवे कॅम्पेन

नवी दिल्ली : दैनिक संध्या

टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडचा प्रमुख फूड ब्रँड 'स्मिथ अँड जोन्स'ने अभिनेत्री रसिका दुगलसोबत आपले नवे कॅम्पेन सुरु केले आहे. भारतातील नंबर-१ कुकिंग पेस्ट म्हणजेच 'स्मिथ अँड जोन्स जिंजर गार्लिक पेस्ट' बनवणाऱ्या या ब्रँडच्या नव्या कॅम्पेनचा उद्देश अतिशय रंजक पद्धतीने ग्राहकांना हे समजावणे आहे की, पेस्ट खरेदी करताना त्यांनी नेमक्या कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. आज बाजारात आले-लसूण पेस्टचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत, पण त्यापैकी कोणते उत्पादन उत्तम आहे हे समजून घेणे ग्राहकांसाठी कठीण जाते. हीच संभ्रमावस्था दूर करण्यासाठी या कॅम्पेनमध्ये एक सोपी व्हिज्युअल टेस्ट दाखवण्यात आली आहे. याद्वारे ग्राहक घट्ट, अस्सल पेस्ट आणि पाण्यासारख्या पातळ पेस्ट मधील फरक स्पष्टपणे पाहू शकतात, जेणेकरून ते विचारपूर्वक योग्य खरेदी करू शकतील. या संपूर्ण कॅम्पेनचे मुख्य सूत्र आहे — 'हो गया न पेस्ट का पेस्ट और पानी का पानी.' या कॅम्पेनबद्दल बोलताना, टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्सच्या प्रेसिडेंट (पॅकेज्ड फूड्स, कॅपिटल फूड्स अँड सोलफुल) श्रीमती दीपिका भान म्हणाल्या, "स्वयंपाकघरात काहीतरी नवीन करणे किंवा वेगवेगळ्या घटकांसह नवीन प्रयोग करणे कधीकधी लोकांना थोडे गुंतागुंतीचे किंवा कठीण वाटू शकते. पण 'स्मिथ अँड जोन्स'सोबत स्वयंपाक करणे अत्यंत सोपे आणि आनंददायी व्हावे हा आमचा उद्देश आहे. आमचे नवे कॅम्पेन याच विश्वासाला पुढे नेते."'द वूम्ब'चे सीओओ हेवल पटेल म्हणाले, "'स्मिथ अँड जोन्स' आले-लसूण पेस्ट बाजारपेठेत आघाडीवर आहे. आज जेव्हा लोक या पेस्टला घरातील इतर किराणा सामानासारखे अगदी सहज आणि सामान्य समजून खरेदी करतात, तेव्हा स्मिथ अँड जोन्सने याकडे ग्राहकांना जागरूक करण्याची एक उत्तम संधी म्हणून पाहिले. उत्तम आणि नेहमी एकसारखी चव देणाऱ्या चांगल्या आले-लसूण पेस्टची खरी परख कशी करावी, हे आम्हाला लोकांना सांगायचे होते. ब्रँडच्या 'टेस्ट गजब' या वचनावर आधारित ही फिल्म दाखवून देते की, कशी एक योग्य आले-लसूण पेस्ट अत्यंत चवदार आणि स्वादिष्ट जेवण बनवण्यासाठी उत्तम पाया तयार करते."

रिव्हरसॉफ्टचे पुण्यातील घरांसाठी हार्ड वॉटर सोल्यूशन्स

रिव्हरसॉफ्ट पुण्यातील घरांच्या खाऱ्या पाण्याच्या समस्येसाठी एक खास उपाय घेऊन आला आहे

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

पुण्यात वाढत्या हार्ड वॉटरच्या (खाऱ्या पाण्याच्या) समस्येमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. खाऱ्या पाण्यारमुळे नळ आणि शॉवरवर पांढऱ्या थराचे डाग पडणे, घरातील उपकरणांमध्ये क्षारांचा थर जमा होणे, साबण आणि डिटर्जंटचा जास्त वापर होणे तसेच केस आणि त्वचेबाबतच्या समस्या निर्माण होऊ शकतात. हिंजवडी, वाकड, बाणेर, बालेवाडी, खराडी, हडपसर, वाघोली आणि पिंपरी-चिंचवड या भागांमध्ये उंच इमारती आणि गेटेड सोसायट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या सोसायट्यांमध्ये महापालिकेचे पाणी, बोअरवेल आणि टँकर अशा वेगवेगळ्या स्रोतांमधून पाणीपुरवठा होत असल्याने पाण्याची गुणवत्ता वेगवेगळी असू शकते.

खारे पाणी आणि पाण्याचे वेगवेगळे स्रोत यामुळे घरांमध्ये सहज बसवता येणाऱ्या हार्ड वॉटर सोल्यूशन्सची गरज वाढत आहे. यासाठी इमारतीच्या संपूर्ण पाणीपुरवठा व्यवस्थेत बदल करण्याची गरज नसते. हे सोल्यूशन थेट पाणी वापरण्याच्या ठिकाणी सहज बसवता येते.

या समस्यांवर उपाय म्हणून रिव्हरसॉफ्टने विविध वॉटर-केअर सोल्यूशन्स उपलब्ध केले आहेत. यामध्ये SF-15 Pro शॉवर आणि टॅप फिल्टर, DIVA-01 शॉवर फिल्टर, DIVA PRO



टॅप फिल्टर आणि Bliss-15C कार्ट्रिज यांचा समावेश आहे. यातील SF-15 Pro हे पुण्यातील प्रमुख उत्पादनांपैकी एक आहे. या फिल्टरमध्ये खाऱ्या पाण्याचा परिणाम कमी करणारा विशेष कंडिशनिंग लेअर असून, तो क्लोरीन आणि पाण्यातील गाळ कमी करण्यास मदत करतो. याफिल्टरमध्ये व्हिटॅमिन C देखील आहे, जे केस आणि त्वचेच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकते. हे फिल्टर पाण्यातील टीडीएस कमी करत नाहीत आणि जिथे पाणी वापरले जाते त्या ठिकाणी सहज बसवता येतात. यासोबतच फिल्टरमधील कार्ट्रिज बदलण्याची आणि रिफिलची मागणीही वाढत आहे. विशेषतः SFC-15 रिप्लेसमेंट कार्ट्रिजला चांगली मागणी आहे. यावरून ग्राहक आता फक्त एकदाच फिल्टर खरेदी करण्याऐवजी पाण्याची गुणवत्ता चांगली ठेवण्यासाठी नियमित वॉटर-केअर आणि देखभालीकडे अधिक लक्ष देत असल्याचे दिसून येते.

पुण्यात पाण्यातील गाळ काढण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सेडिमेंट फिल्टरची मागणीही वाढत आहे. रिव्हरसॉफ्टच्या सेडिमेंट फिल्टरला दरवर्षी चांगली मागणी मिळत आहे. किचन टॅप एक्स्टेंडर, वॉशिंग मशीन फिल्टर आणि प्री-फिल्टर या उत्पादनांची मागणीही वाढत आहे. यावरून घरातीलपाणी वापराच्या वेगवेगळ्या ठिकाणी पाण्याची गुणवत्ता सुधारण्याकडे लोक अधिक लक्ष देत असल्याचे दिसून येते. पुण्याच्या पश्चिम आणि पूर्व भागातील निवासी परिसरांमध्ये रिव्हरसॉफ्टच्या उत्पादनांची मागणी वाढत आहे. हार्ड वॉटर, पाण्यातील गाळ आणि रोजच्या घरगुती पाण्याच्या गुणवत्तेशी संबंधित समस्यांवर लोक आता सोपे उपाय शोधत आहेत. त्यामुळे पुणे हे रिव्हरसॉफ्टसाठी महत्त्वाचे आणि वेगाने वाढणारे बाजारपेठ म्हणून समोर येत आहे.

एअरटेल सर्व पोस्टपेड प्लॅनवर मोफत इंटरनॅशनल रोमिंग देते

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा पुरवठादारांपैकी एक, भारती एअरटेल ("एअरटेल"), यांनी आज नवीन पोस्टपेड प्लॅन लॉन्चची घोषणा केली, ज्यामध्ये अधिक लाभ समाविष्ट आहेत. ८ ऑक्टोबर २०२६ पासून, ग्राहक या नवीन पोस्टपेड प्लॅनसह दरवर्षी एका आंतरराष्ट्रीय प्रवासात मोफत रोमिंगचा आनंद घेऊ शकतात, तसेच सर्व विद्यमान लाभही.

हे पूरक इंटरनॅशनल रोमिंग पॅक ५जीबी डेटा, ६० मिनिटे कॉल, २५ आउटगोइंग एसएमएस आणि मोफत इनकमिंग एसएमएस देते, जे ५ दिवसांसाठी वैध आहे. ग्राहकांना त्यांच्या आवडत्या वेळी ५-दिवसीय पॅक सक्रिय करण्याची संपूर्ण लवचिकता आहे, ज्यामुळे परदेशात प्रवास करताना जोडलेले राहणे सोपे होते. एअरटेल पोस्टपेड फॅमिली प्लॅनवरील ग्राहकांसाठी, मोफत इंटरनॅशनल रोमिंग पर्याय प्लॅनचा भाग असलेल्या प्रत्येक कुटुंब सदस्यासाठी उपलब्ध आहे. मोफत इंटरनॅशनल रोमिंग ही एअरटेल पोस्टपेड प्लॅनमधील नवीनतम भर आहे, जी फास्ट लेन तंत्रज्ञानाद्वारे उत्कृष्ट अनुभव, अनलिमिटेड डेटा, स्पॅम आणि फसव्या लिंक्सविरुद्ध नेटवर्क-स्तरीय संरक्षण देते. ग्राहक एअरटेल पोस्टपेड अॅडव्हांटेज क्लबद्वारे विविध मनोरंजन सदस्यता आणि एक्सक्लुझिव्ह अनुभवांचा आनंद घेऊ शकतात, ज्यामध्ये कॉमेडी शो, चित्रपट प्रीमियर आणि कॉन्सर्टचा समावेश आहे. लॉन्चबद्दल मत व्यक्त करताना, भारती एअरटेलचे डायरेक्टर - मार्केट ऑपरेशन्स, अमित त्रिपाठी म्हणाले, "आमच्यासाठी पोस्टपेड म्हणजे भारतीय बाजारात सर्वोत्तम-इन-क्लास अनुभव देणे.

■ मोफत इंटरनॅशनल रोमिंग, अनलिमिटेड डेटा, फास्ट लेन टेक, सेफ्टी फीचर्स आणि मनोरंजन यांच्या अतिरिक्त लाभासह नवीन पोस्टपेड प्लॅन लॉन्चची घोषणा

airtel

देशात आमचा सर्वोत्तम नेटवर्क अनुभव आहे, ज्यावर आम्ही आमच्या पोस्टपेड ग्राहकांना ५जीवर फास्ट लेन तंत्रज्ञान आणि सतत स्पॅम व फसवणूक संरक्षण देतो. शिवाय, आम्ही ग्राहकांना सर्वोत्तम मूल्य देतो - मनोरंजन आणि सेवांमध्ये प्रवेशाद्वारे जे त्यांचे दैनंदिन जीवन समृद्ध करते; आणि आता त्यांच्यासाठी मोफत इंटरनॅशनल रोमिंग. आम्ही ग्राहकांसाठी सतत खेळाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि एअरटेल पोस्टपेड निवडण्यासाठी त्यांना अधिकाधिक कारणे देण्यासाठी कटिबद्ध आहोत." ८ ऑक्टोबर २०२६ पासून लागू, हे पोस्टपेड प्लॅन एअरटेल पोस्टपेड निवडणाऱ्या सर्व ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. विद्यमान एअरटेल ग्राहक (जुने पोस्टपेड प्लॅन किंवा प्रीपेडवर असलेले) एअरटेल अॅपद्वारे किंवा जवळच्या एअरटेल स्टोअरला भेट देऊन सहजपणे या प्लॅनमध्ये अपग्रेड करू शकतात. नॉन-एअरटेल ग्राहक एअरटेल अॅपद्वारे किंवा एअरटेल स्टोअरला भेट देऊन एअरटेलला स्विचिंग विनंती करून एअरटेल पोस्टपेडमध्ये स्विच करू शकतात.

६५ मी. रुंद पुणे इनर रिंग रोड या रस्त्याकरिता मौजे धामणे, ता. मावळ, जि. पुणे येथील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. ०६ पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय, ए विंग,
तळमजला, पुणे ४११ ००१.
क्र.उपजि/०६/भूसं/कावि/एसआर/०७/२०२६

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांनी ६५ मी. रुंद पुणे डनर रिंग रोड या रस्त्याकरिता महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दिनांक १२ मे २०१५ व त्याअनुषंगाने पारित झालेल्या विविध शासन निर्णय/परिपत्रकामधील तरतुदीस अनुसरून मौजे धामणे, ता. मावळ, जि. पुणे येथील खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांचे नावे घेण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील आदेश क्र. पीएलसी/एसआर/३५/२०२६, दि ०९/०९/२०२६ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ आणि तनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वनविभाग क्र.एलक्यूएन-/२०१७/०१प्र.क्र./१२अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे भूसंपादनाची कार्यवाही करणेकामी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ०६) पुणे यांना प्रधिकृत केले आहे.

त्याअथी, आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ०६) पुणे याद्वारे, खालील अनुसूचीमध्ये नमूद खाजगी जमीनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे;
२. जमीनी थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत नवीन भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २ ६ ते ३० च्या व शेड्युल-१ च्या तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडोल दि. १२/०५/२०१५ व तद्अनुषंगाने पारित झालेल्या विविध शासन निर्णय / परिपत्रकानुसार मोबदला निश्चित करण्यात येईल.
३. या नोटीसमध्ये संपादन मंडळाकडून प्राप्त झालेल्या भूसंपादन प्रस्तावानुसार मिळकतींचा तपशील नमूद केला असून, प्रत्यक्षात उपअधिक्षक भूमि अभिलेख मावळ यांचे कार्यालयाकडून त्याबाबत संयुक्त मोजणी होवून, संयुक्त मोजणी अहवाल उर्पाजल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ०६) पुणे यांचे कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे अंतिमतः संपादन क्षेत्र निश्चित करणेत येईल.
४. सदर भूसंपादनासंबंधीची कागदपत्रे संबंधित भूधारकांना उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ०६) पुणे यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे वेळेत पाहणेसाठी उपलब्ध आहेत.
५. तसेच सदर जमिनीमध्ये अधिकार अभिलेखातील इसमांव्यतिरिक्त इतर कोणाचे काही हक्क/हितसंबंध असल्यास, मालकीहक्काबाबत कोणत्याही स्वरुपाचा वाद सुरु असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ०६) पुणे यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, ए विंग, तळमजला, पुणे ४११००१ येथे कागदोपत्री पुराव्यांमह दाखल कराव्यात अन्यथा सदर जमिनी निर्वेध/निर्जोखमी आहेत असे समजून सद्यस्थितीतील अधिकार अभिलेखातील विद्यमान जमिन मालकांकडून थेट खरेदी पध्दतीने संपादनाबाबतची पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

अनुसूची

थेट खरेदी पध्दतीने संपादन करावयाच्या जमीनीचा तपशील

गाव :- मौजे धामणे, ता. मावळ, जि. पुणे

अ. क्र.	भूमापन / गट क्रमांक	अंदाजित संपादन क्षेत्र (हे.आर./चौ.मी.)
१	४३७ पैकी	९५९.९६
२	४३८ पैकी	६३०३.५२
३	४४२ पैकी	१७८६.२३
४	४४३ पैकी	१६४५.०१
५	४४४ पैकी	१०७९.८१
६	४४५ पैकी	१२३८.७०
७	४४६ पैकी	१२२२.३९
८	४४७ पैकी	१०९२.४८
९	४४८ पैकी	१६७४.४२
१०	४४९ पैकी	२००८.७४
११	४५० पैकी	४२३१.७०
१२	४५२ पैकी	८९२.८०
१३	४५३ पैकी	१२५७.६६
१४	४५४ पैकी	३२५६.१२
१५	४५७ पैकी	२२४८.००
१६	४५८ पैकी	२०५३.०३
१७	४५९ पैकी	१२४६.११
१८	४८५ पैकी	४७१.४६
१९	४६० पैकी	२७२१.६८
२०	४६२ पैकी	१२८२.७५
२१	४६३ पैकी	३७५९.६७
२२	४६४ पैकी	३३९८.६३
२३	४६५ पैकी	४५५६.१२
२४	४६६ पैकी	५६४३.८८
२५	१७१ पैकी	२६९४.२९
२६	१७३ पैकी	४१९०.२७
२७	१८० पैकी	५९१३.६१
२८	१८१ पैकी	९६५८.९३
२९	१८८ पैकी	४९६५.१७
३०	१८९ पैकी	५०६८.१०
३१	२५५ पैकी	१२३९६.४३
३२	२४० पैकी	१५६९६.३८
३३	२४१ पैकी	७१७७.७३
३४	२४२ पैकी	१८००.०३
३५	२४३ पैकी	२६९१.५१
३६	२४४ पैकी	३१३४.४८
३७	२४५ पैकी	५४८२.२९
३८	२४६ पैकी	१२७०६.०२
३९	२४७ पैकी	४०९८.२०
४०	२४८ पैकी	३८६८.८५
४१	२४९ पैकी	३७५४.८२
४२	२५० पैकी	३२२८.४४
४३	२५१ पैकी	२६५४.४५
४४	२५२ पैकी	२३४.१९
४५	२३९ पैकी	३१९८.८७
४६	२२४ पैकी	३९.१४
४७	२२५ पैकी	४०.६१
४८	२२९ पैकी	१७२५.६४
४९	२३० पैकी	३०७७.८२
५०	२३१ पैकी	९६७.६४
५१	२३४ पैकी	६२६.५२
५२	२३३ पैकी	६०६.०४
५३	२३५ पैकी	९३५.७६
५४	२३२ पैकी	६२३.५६

ठिकाण :- पुणे
दिनांक :- २८/०९/२०२६

सही/-
(डॉ. वनश्री लाभशेटवार)
उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ०६

जिमाका/पुणे/जाहिरात /२८३/२०२६-२७

थोडक्यात पण महत्वाचे



‘क्लिक’ विचार करायला लावणारी; हृदयनाथ मंगेशकरांकडून छायाचित्रकारांचे कौतुक

पिंपरी : दैनिक संध्या

एखाद्या क्षणाला कॅमेऱ्यात बंदिस्त करणारी एक ‘क्लिक’ किती व्यापक आशय व्यक्त करू शकते, किती प्रश्न उपस्थित करू शकते आणि विचार करायला भाग पाडू शकते, याची प्रचिती पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांतील वृत्तपत्र छायाचित्रकारांनी टिपलेल्या छायाचित्रांच्या प्रदर्शनातून येत आहे. ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते शनिवारी (दि.३) चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या कलादालनात या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. हे प्रदर्शन ९ ऑक्टोबरपर्यंत नागरिकांसाठी खुले राहणार आहे. अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त पुणे श्रमिक पत्रकार संघ आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील वर्तमानपत्रांच्या छायाचित्रकारांनी आपल्या कॅमेऱ्यातून टिपलेल्या विविध घटनांचे, माणसांच्या भावविश्वाचे, सामाजिक वास्तवाचे आणि शहराच्या बदलत्या स्वरूपाचे दर्शन या प्रदर्शनातून घडते. बातमीच्या पलीकडे जाऊन छायाचित्रांमधून व्यक्त होणारा आशय आणि त्यामागील छायाचित्रकारांची निरीक्षणशक्ती हे प्रदर्शनाचे वैशिष्ट्य ठरले आहे. उद्घाटनानंतर हृदयनाथ मंगेशकर यांनी प्रदर्शनातील छायाचित्रांची पाहणी केली. प्रत्येक छायाचित्रामागील आशय आणि त्यातून व्यक्त होणाऱ्या भावना यांचे त्यांनी कौतुक केले. छायाचित्रकारांना विशेष शुभेच्छा देत त्यांच्या कामाला प्रोत्साहन दिले. एखाद्या क्षणाचे छायाचित्रण केवळ दृश्य टिपण्यापुरते मर्यादित नसते, तर त्या दृश्यातून अनेक अर्थ उलगडत असतात, याची जाणीव या प्रदर्शनातून होते. या वेळी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रम बगाडे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे उपाध्यक्ष किशोर बरकले, कार्यकारिणी सदस्य मिलिंद शुक्ल, महापालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि पत्रकार उपस्थित होते. पुणे पत्रकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या प्रदर्शनाच्या आयोजनासाठी पुणे श्रमिक पत्रकार संघाचे कार्यकारिणी सदस्य तुषार झरेकर यांच्यासह पिंपरी-चिंचवड शहरातील वृत्तपत्र छायाचित्रकार आणि पत्रकारांनी विशेष मेहनत घेतली. छायाचित्रांची निवड, प्रदर्शनाची मांडणी आणि आयोजनासाठी त्यांनी पुढाकार घेतला. रोजच्या बातम्यांच्या धावपळीत समाजाचे वास्तव टिपणाऱ्या छायाचित्रकारांच्या कलात्मक दृष्टिकोनाला व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या कामाची दखल नागरिकांनी घ्यावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. हे प्रदर्शन ९ ऑक्टोबरपर्यंत नागरिकांसाठी खुले राहणार असून, छायाचित्रांच्या माध्यमातून शहराचा वेध घेण्याची आणि पत्रकारांच्या नजरेतून समाजाचे विविध पैलू अनुभवण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे.

ऊसतोडीच्या पैशांच्या वादातून अपहरण; यवतमाळमधून आठ आरोपी जेरबंद

पिंपरी: दैनिक संध्या

उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने अपहरणाच्या गंभीर गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत छडा लावत यवतमाळ येथून आठ आरोपींना अटक केली असून अपहृत राजेश बाळू चव्हाण यांची सुखरूप सुटका केली आहे. ऊसतोडीच्या उचलीच्या पैशांच्या वादातून हे अपहरण करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घाटेवस्ती, आंबेठाण येथून तीन रिक्षांमधून आलेल्या काही इसमांनी राजेश चव्हाण यांचे त्यांच्या मोटारसायकलसह अपहरण केले. याप्रकरणी सुषमा राजेश चव्हाण (वय ३०) यांनी उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अपहरणासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला. तपासादरम्यान अमोल रामराव राठोड, सचिन रामराव राठोड आणि निलेश संतोष राठोड या तिघांना शिक्रापूर परिसरातून ताब्यात घेण्यात आले. सखोल चौकशीत ऊसतोडीच्या उचलीच्या पैशांच्या व्यवहारातून निर्माण झालेल्या वादातून संदीप गुलाब राठोड याच्यासह एकूण आठ जणांनी मिळून राजेश चव्हाण यांचे अपहरण केल्याची कबुली दिली. आरोपींनी राजेश चव्हाण यांना आंबेठाण येथून जबरदस्तीने तीन रिक्षांमधून यवतमाळ जिल्ह्यात नेल्याचे समोर आले. त्यानंतर पोलीसांनी तातडीने यवतमाळ जिल्ह्यातील दिंडाळा व परिसरात शोधमोहीम राबवत उर्वरित आरोपींना अटक केली. तसेच अपहृत राजेश चव्हाण यांची गुन्हा घडल्यापासून २४ तासांच्या आत सुखरूप सुटका करण्यात यश मिळवले. पोलीसांनी आरोपींकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली ह्युंदाई वेन्यू कार, तीन ऑटो रिक्षा आणि अपहृताची शाईन मोटारसायकल असा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक कल्याण घाडगे करीत आहेत. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन दिगंबर सुर्यवशी, सहायक पोलीस निरीक्षक कल्याण घाडगे, सहायक पोलीस फौजदार यदु आढारी, पोलीस हवालदार विठ्ठल वडेकर, अनिल गोरड, भैरोबा यादव, संतोष काळे, पोलीस शिपाई बापुराव सोनपसारे, गणेश गायकवाड, मंगेश कदम, संतोष वायकर, हरी रणदिवे, शुभम खंडागळे, मंगेश घोलप, साहिल सांडभोरे, समीर महात यांनी केली आहे.

ट्रॅव्हल्सची कंटेनरला जोरदार धडक

पिंपरी : दैनिक संध्या

पुणे-मुंबई महामार्गावरील लोणावळा येथील कनेक्टिंग लिंकवर मंगळवारी (दि. ६) पहाटे ४.५० च्या सुमारास एक भीषण अपघात घडला. वेगात असलेल्या एका ट्रॅव्हल्सचालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने बसने समोर चाललेल्या कंटेनरला मागून जोरदार धडक दिली. या अपघातात २ जण गंभीर जखमी झाले असून, अन्य ६ ते ७ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. कंटेनरचालक मुहम्मद हमीद सुहेब (वय ३०, रा. कन्नूर, तामिळनाडू) असे जखमी व्यक्तीचे नाव आहे. दुसऱ्या गंभीर जखमी व्यक्तीचे नाव समजू शकले नाही. मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, मंगळवारी पहाटे ४.५० च्या सुमारास मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर (कनेक्टिंग लिंक किलोमीटर ०८/१००, सीपी १९ व सीपी २० दरम्यान) हा अपघात घडला. कंटेनरचालक मुहम्मद हमीद सुहेब हे (टीएन ०२ सीबी ००३१) मुंबईच्या दिशेने जात होते. या वेळी मागून आलेल्या ट्रॅव्हल्स बस (एमएच २० इएल ५१००) चालकाचे नियंत्रण सुटले आणि बसने कंटेनरला जोरदार धडक दिली. अपघाताच्या वेळी बसमध्ये सुमारे ४० प्रवासी होते. कंटेनरचालक मुहम्मद हमीद सुहेब हे (टीएन ०२ सीबी ००३१) मुंबईच्या दिशेने जात होते. या वेळी मागून आलेल्या ट्रॅव्हल्स बस (एमएच २० इएल ५१००) चालकाचे नियंत्रण सुटले आणि बसने कंटेनरला जोरदार धडक दिली. अपघाताच्या वेळी बसमध्ये सुमारे ४० प्रवासी होते.

मिशन वॉन्टेडमध्ये ‘अँटी गुंडा स्कॉड’ अव्वल

युनिट तीन दुसरे, युनिट एक व दोन तिसऱ्या क्रमांकावर; २४७ आरोपींची धरपकड

■ पिंपरी (दै. संध्या)



वॉन्टेड आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी राबविलेल्या १५ दिवसांच्या ‘मिशन वॉन्टेड’मुळे गुन्हेगारी वर्तुळात खळबळ उडाली आहे. पोलीस ठाणी आणि गुन्हे शाखेने केलेल्या धडक कारवाईत २४७ आरोपींना पकडण्यात यश मिळाले आहे. गुन्हे शाखेच्या अंतर्गत स्पर्धेत अँटी गुंडा स्कॉडने १३२ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. युनिट तीनने १०३ गुणांसह दुसरा, तर युनिट एक आणि युनिट दोनने प्रत्येकी ८४ गुण मिळवत संयुक्त तिसरे स्थान मिळविले.

पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध गुन्ह्यांत वॉन्टेड असलेल्या आरोपींची संख्या मोठी असल्याने २७ जुलै ते १२ ऑगस्टदरम्यान विशेष मोहीम हाती घेण्यात आली. मोहिमेपूर्वी २ हजार ६३५ पाहिजे आणि ३२ फरारी असे एकूण २ हजार ६६७ आरोपी पोलिसांच्या रडारवर होते. त्यानंतर पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या आदेशानुसार पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेची स्वतंत्र पथके कामाला लावण्यात आली. आरोपींचे जुने पत्ते, नातेवाईक आणि संपर्कातील व्यक्ती यांचा माग काढण्याबरोबरच उपलब्ध माहितीच्या आधारे शोधमोहीम तीव्र करण्यात आली.

या कारवाईत पोलीस ठाण्यांनी १४०, तर गुन्हे शाखेने १०७ आरोपी पकडले. याशिवाय मृत्यू, प्रकरण, अटकपूर्व कारवाई किंवा दुबार नावे अशा कारणांमुळे ७९ प्रकरणे कमी झाली आहेत. त्यामुळे एकूण ३२६ प्रकरणांचा निपटारा होऊन आता २ हजार ३४१ आरोपींचा शोध बाकी असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होत आहे.


गुन्हे शाखेच्या कामगिरीत अँटी गुंडा स्कॉडने मोक्कातील सहा, गंभीर गुन्ह्यांतील नऊ आणि इतर गुन्ह्यांतील सहा अशा २१ आरोपींना पकडत १३२ गुणांची मजल मारली. विशेष म्हणजे, संख्येच्या बाबतीत युनिट तीनने सर्वाधिक २४ आरोपी पकडले; मात्र गुन्ह्यांचे स्वरूप आणि त्यासाठी निश्चित केलेल्या गुणांकनामुळे अँटी गुंडा स्कॉडने बाजी मारली. युनिट तीनच्या कारवाईत मोक्कातील एक, गंभीर गुन्ह्यांतील आठ आणि इतर गुन्ह्यांतील १५ आरोपींचा समावेश आहे.विशेष मोहिमेमुळे अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपींच्या हालचालींवर मर्यादा आल्या असून, फरारांच्या गोटात धडकी भरल्याचे चित्र आहे.

जुन्या गुन्ह्यांच्या फायली पुन्हा उघडून आरोपींचा माग काढण्यात आल्याने काही आरोपींना आपली सुरक्षित ठिकाणे बदलावी लागल्याची चर्चा आहे. दरम्यान, अद्याप मोठ्या संख्येने आरोपी पकडायचे असल्याने ‘मिशन वॉन्टेड’ची धार कायम ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

पोलीस ठाण्यांच्या कामगिरीत हिंजवडी पोलीस ठाण्याने १९ आरोपी पकडून ८४ गुणांसह पहिला क्रमांक मिळविला. पिंपरीने १२ आरोपी पकडून ५७ गुणांसह दुसरे, तर सांगवीने १० आरोपी पकडून ५४ गुणांसह तिसरे स्थान मिळविले. त्यापाठोपाठ संत तुकारामनगर आणि वाकड प्रत्येकी ४८, निगडी ४२, चिखली ३७, तळेगाव दाभाडे ३३, चाकण उत्तर ३० आणि आळंदी पोलीस ठाण्याने २७ गुण मिळविले आहेत . अँटी गुंडा स्कॉडने १३२ गुणांसह पहिला, युनिट तीनने १०३ गुणांसह दुसरा, तर युनिट एक आणि युनिट दोनने प्रत्येकी ८४ गुणांसह संयुक्त तिसरा क्रमांक मिळविला. युनिट चारने ६९, मालमत्ता/दरोडा विरोधी पथकाने २४, अमली पदार्थ विरोधी पथकाने १८ आणि खंडणी विरोधी पथकाने तीन गुण मिळविले. ‘मिशन वॉन्टेड’मध्ये अँटी गुंडा स्कॉडने राज्यांच्या सीमा ओलांडून मोक्कातील आरोपींचा माग काढला आहे. मोहिमेदरम्यान पाच वेगवेगळ्या राज्यांतून मोक्काच्या प्रकरणांतील आरोपींना ताब्यात घेण्यात आले. हरियाणातून सुभाष बिश्नोई, उत्तर प्रदेशातून वैभव नागझरकर, तेलंगणातून अफजल शहा, कर्नाटकातून अंकुश सूर्यवंशी, तर बिहारमधून प्रकाश राम आणि चंदन राम यांना पथकाने हुडकून काढले. याशिवाय तळेगाव येथील स्थानिक आरोपी सौरभ आरगडे यालाही ताब्यात घेण्यात आले. अशा प्रकारे मोक्कातील सात आरोपींना ताब्यात घेत अँटी गुंडा स्कॉडने ‘मिशन वॉन्टेड’मध्ये आपली छाप पाडली. “गंभीर गुन्हे करून फरार झालेल्या तसेच दीर्घकाळापासून पाहिजे असलेल्या आरोपींना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी ही विशेष मोहीम राबविण्यात आली. पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेने चांगली कामगिरी केली आहे. अद्याप फरार असलेल्या आरोपींचा शोधही त्याच तीव्रतेने सुरू राहणार आहे.

पिंपळे गुरवमधील कारवाईवरून नागरिकांचा संताप

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २९ पिंपळे गरव येथील सृष्टी चौक परिसरातील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात येत आहे. मात्र, तब्बल सात मजली इमारत उभी राहेपर्यंत महापालिका प्रशासनाचे लक्ष कुठे होते?, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

बांधकाम सुरू असतानाच बीट निरीक्षक, संबंधित अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनास हे बांधकाम आले नव्हते का? संबंधित अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले का, असा प्रश्नही नागरिकांकडून विचारला जात आहे. अनधिकृत बांधकामे सुरू असताना सुरुवातीच्या टप्प्यातच त्यांच्यावर कारवाई का केली जात नाही? बांधकाम मोठ्या आकारात उभे राहिल्यानंतर नोटिसा बजावणे आणि पाडकामाची कारवाई करणे, अशीच कार्यपद्धती आहे का, अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. या प्रकरणात कोणत्याही अधिकाऱ्यावर गैरप्रकाराचा आरोप सिद्ध झालेला नसून, नागरिकांकडून उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांची चौकशी होणे आवश्यक आहे. दरम्यान, संबंधित परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरू असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. काही मोठ्या बांधकामांवर कारवाई होत नसल्याने महापालिकेच्या कारवाईच्या पद्धतीबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

औद्योगिक क्रीडा संघटनेच्या ६३ व्या कॅरम स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ चिंचवड(दै. संध्या)

औद्योगिक क्रीडा संघटनेच्या वतीने आयोजित ६३वी कॅरम स्पर्धा रविवारी चिंचवड येथील एसकेएफ बेअरिंग इंडिया एम्प्लॉइज युनियन हॉलमध्ये उत्साहात पार पडली. या स्पर्धेचे आयोजन एसकेएफ इंडिया, चिंचवड यांनी केले होते. स्पर्धेत एसकेएफ, पीसीएमसी, बजाज ऑटो, जेसीबी इंडिया, महिंद्रा अँड महिंद्रा, टाटा मोटर्स, टीसीएस, टेक महिंद्रा, सँडविक एशिया, भारत फोर्ज, इन्फोसिस, टेट्रापॅक, थरमॅक्स, मर्सिडीजसह विविध ४७ नामांकित कंपन्यांतील एकूण २२९ पुरुष व महिला खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

स्पर्धा पुरुष एकेरी, पुरुष दुहेरी, महिला एकेरी आणि महिला दुहेरी अशा चार गटांत घेण्यात आली. विशेष म्हणजे, यंदा प्रथमच औद्योगिक क्रीडा संघटनेतर्फे कामगार क्षेत्रातून निवृत्त झालेल्या कर्मचारी व कामगारांसाठी स्वतंत्र गटाची स्पर्धा आयोजित करण्यात आली.

पारितोषिक वितरण समारंभाच्या प्रारंभी प्रदीप वाघ यांनी प्रास्ताविक केले, तर नरेंद्र कदम यांनी संस्थेच्या वाटचालीची माहिती दिली. सचिव वसंत ठोंबरे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. पारितोषिकांचे वितरण वसंत ठोंबरे, नरेंद्र कदम, संतोष शिंदे, विजय हिंगे, मंदार कुलकर्णी, अंकित दौंड आणि नितीन कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संतोष सोनटक्के, हरी देशपांडे, अमित कदम, अतुल काळोखे, दयानंद नरवडे, दत्ता गायकवाड, मिनार गजने, सचिन कांबळे, किरण कंक, मेनिनो कार्डोझ, दुष्यंत गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप वाघ यांनी केले.

ज्युनिअर नॅशनल ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी भोईर व अंधारे यांची निवड

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहरातील उदयोन्मुख ॲथलेटिक्स खेळाडू समृद्धी भोईर आणि प्राची अंधारे यांची 41 व्या नॅशनल ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप 2026 साठी निवड झाली आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत दोन्ही खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धेत प्रवेश मिळवला आहे.

समृद्धी भोईर हिची हॅप्टाथलॉन (Heptathlon) प्रकारात, तर प्राची अंधारे हिची 5,000 मीटर चालणे (Race Walking) या प्रकारात निवड झाली आहे. राज्य स्पर्धेत दोघींनीही उल्लेखनीय कामगिरी करून आपली गुणवत्ता सिद्ध केली. प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धा 23 ते 27 ऑक्टोबर 2026 दरम्यान चेन्नई (तामिळनाडू) येथे आयोजित करण्यात आली आहे. देशभरातील गुणवंत युवा खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार असून महाराष्ट्राच्या संघाकडून समृद्धी आणि प्राची यांच्याकडूनही दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.दोन्ही खेळाडूंच्या निवडीमुळे त्यांच्या प्रशिक्षकांसह कुटुंबीय आणि क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण असून, आगामी राष्ट्रीय स्पर्धेत त्या महाराष्ट्राला पदक मिळवून देतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

प्रॉपर्टीच्या वादातून रक्ताचे नाते संपवले

■ पिंपरी (दै. संध्या)



प्रॉपर्टीच्या वादातून ८३ वर्षीय आजोबांनीच नातवाचा खून केल्याचा धक्कादायक प्रकार पुणे जिल्ह्यातील लोणावळा भागातून उघडकीस आला आहे. घटनेच्या सुरुवातीला अपघात वाटलेले हे प्रकरण आता खुनामध्ये बदलले गेले आहे. रायफल साफ करत असताना अचानक गोळी सुटल्याने तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची घटना समोर आली होती. मात्र पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा आणि लोणावळा शहर पोलिसांनी केलेल्या तपासातून आजोबांनीच नातवाचा खून केल्याचं निष्पन्न झालं आहे.

अभय माणिक मराठे (वय ३३) असे मृत्युमुखी पाडलेल्या तरुणाचे नाव आहे. ही घटना लोणावळ्यातील भुशी गावातील हॉटेल “मोतीराम”च्या आवारात घडली. अभय मराठे हे लोणावळा शहराचे माजी नगरसेवक माणिक मराठे यांचे सुपुत्र होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा सगळा प्रकार ५ ऑक्टोबर रोजी घडला. आजोबांची रायफल साफ करताना अभय मराठे यांना गोळी लागली आणि ते रक्ताच्या थारोळ्यात पडले. या घटनेत ते गंभीर जखमी झालेल्या मराठे यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच लोणावळा शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सुरुवातीला या प्रकरणी लोणावळा शहर पोलिस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली. मात्र मृतदेहाचे शवविच्छेदन सुरू असताना पोलिसांना या प्रकरणाचा संशय आला. मृतदेहाची पाहणी करताना रायफल वरून गोळीबार झाला तर थेट पोटात छिद्र पडलं असं दिसलं आणि हा गोळीबार असल्याचा संशय पोलिसांना आला.पोलिसांनी तात्काळ हॉटेल मोतीराम येथील कार्यरत असलेल्या वेटर आणि इतर लोकांची चौकशी केल्यानंतर अभय मराठे यांचा अपघाती मृत्यू नसून खून असल्याचं स्पष्ट झालं.

तपासादरम्यान, अभय यांचे आजोबा मोतीराम मराठे (वय ८३) यांनीच गोळीबार करून त्याचा खून केल्याचं समोर आलं. पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी दिलेल्या माहितीनुसार, मोतीराम मराठे आणि त्यांचे नातू अभय मराठे यांच्यात प्रॉपर्टी वरून वाद सुरू होता.

अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत आयोजित बालगीतांच्या मैफलीस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

■ पिंपरी (दै. संध्या)

गणपती उत्सवातील आठवणी, भूक लागलेल्या कावळेदादासाठी चिमणीने आणलेला पाव, दुध पिणारी मनीमाऊ, प्राण्यांना घेऊन जाणारी झुकझुक गाडी, डूलत चाललेला हत्तुल्या, कोंबडीच्या पिल्लाची शिकवणी अशा बहारदार वर्णनाच्या बालगीत मैफलीस बच्चेकंपनीने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. निमित्त होते मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने “अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत मंगळवार दि.६ रोजी सुप्रसिद्ध गीतकार, गायिका आणि संगीतकार भारती न्यायाधीश यांच्या बालगीतांच्या कार्यक्रमाचे.

संत तुकाराम नगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अधिपत्याखाली हा कार्यक्रम झाला.

विजय न्यायाधीश यांच्या संकल्पनेतून सादर झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात ” या हो या, या हो या गणपती बाप्पा लवकर या” या गीताने करण्यात आली. त्यानंतर भारती न्यायाधीश आणि त्यांचे बालकलावंत ध्वनी गुप्ता, ईरा चायनाखवा आणि शौर्यवी मांडवगडे यांनी एकापेक्षा एक सरस बालगीते सादर करुन उपस्थित रसिक विद्यार्थ्यांची मने जिंकली.

“आमच्या घरची मनीमाऊ”, “कावळेदादा काव काव”, “झुक झुक झुक निघाली जंगलक्वीन”, “हत्तुल्या रे हत्तुल्या”, “कोंबडीने शिकविले पिल्लाला” या काही बालगीतांना शालेय विद्यार्थ्यांनी विशेष दाद दिली. “डुबी डुबी डम डम” या गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या कार्यक्रमासाठी महानगरपालिकेचे ग्रंथालय समन्वयक प्रविण चाबुकस्वार , प्रशासकीय अधिकारी दत्तात्रय सुर्यवंशी तसेच किशोर केदारी आणि साळवे यांचे सहकार्य लाभले.



थोडक्यात पण महत्वाचे



अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी सावित्रीच्या लेकी आक्रमक

चाकण : दैनिक संध्या

सकल ओबीसी समाजाच्या न्याय हक्कांसाठी पुणे शहरात सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी पुणे ग्रामीण भागातील महिला पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी सावित्रीच्या लेकी आक्रमक झाल्या असून, महिला पदाधिकाऱ्यांनी दिवसभर उपोषणात सहभागी होत ओबीसी समाजाच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या शोभा शेवकरी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या उपोषणाला सामाजिक कार्यकर्त्या गौरी पिंगळे यांच्यासह पुणे ग्रामीण मधील महिला पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती लावली. यावेळी चाकणच्या माजी नगराध्यक्षा मंगल गोरे, ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या मीना गोरे, सामाजिक कार्यकर्त्या मंगल शेवकरी, जनाबाई शेवकरी, गौरी पिंगळे यांच्यासह अन्य महिला पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. आंदोलनाला मंगल शेवकरी, नगरसेवक गुलाब शेवकरी, उद्योजक सुनील शेवकरी, तुकाराम कांडगे, माजी सरपंच नंदकुमार जाधव, मंगल जाधव यांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला.

खानवडी स्मारकावरून वाद : ४ कोटींचे नवे बांधकाम, जुने सभागृह पाडणार?

पुरंदर : दैनिक संध्या

क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांचे मुळ गाव असलेल्या खानवडी (ता. पुरंदर) येथे प्रस्तावित फुले स्मारकाच्या वाडा इमारतीचे तब्बल ४ कोटी १ लाख ४१ हजार रुपयांचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. जिल्हा परिषद पुणे बांधकाम विभाग दक्षिण मार्फत ९ सप्टेंबर २०२६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. मे. कोहिनूर कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराला ३०० दिवसांत म्हणजेच ६ जुलै २०२७ पर्यंत काम पूर्ण करण्याची मुदत दिली आहे. या स्मारकासाठी एकूण ७ कोटी २१ लाखांचा निधी मंजूर आहे. त्यापैकी वाडा इमारतीसाठी ४ कोटी १ लाखांची निविदा मंजूर झाली आहे. विद्युत कामासाठीही वेगळा निधी मंजूर आहे. पण ग्रामस्थांचा आक्षेप असा आहे की, याच परिसरात काही वर्षांपूर्वी शासनाच्या निधीतूनच सभा मंडप आणि इतर बांधकामे उभारण्यात आली होती. तीच बांधकामे आता नव्या स्मारकासाठी पाडावी लागणार असल्याची चर्चा आहे.



कुरकुंभ औद्योगिक वसाहतीत आपत्कालीन परिस्थितीचा संयुक्त सराव यशस्वी

कुरकुंभ : दैनिक संध्या

संभाव्य औद्योगिक आपत्कालीन परिस्थितीत विविध औद्योगिक आस्थापना, शासकीय यंत्रणा, पोलीस प्रशासन, अग्निशमन दल, वैद्यकीय पथक आणि स्थानिक प्रशासन यांच्यातील समन्वय, तत्परता व आपत्कालीन प्रतिसादाची कार्यक्षमता तपासण्यासाठी कुरकुंभ, ता. दौंड, औद्योगिक वसाहतीमध्ये आज संयुक्त आपत्कालीन सराव यशस्वीरीत्या पार पडला. सहसंचालक श्री. सुधीर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सरावामध्ये अमोनिया वायूची वाहतूक करणाऱ्या टँकरमधून अमोनिया वायूची गळती होऊन गुडलक चौक परिसरात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्याचे काल्पनिक दृश्य तयार करण्यात आले. या परिस्थितीला अनुसरून बचावकार्य, प्रथमोपचार, जखमींचे स्थलांतर, अग्निशमन, वाहतूक नियंत्रण, परिसर सुरक्षित करणे तसेच नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्याचा प्रत्यक्ष सराव करण्यात आला. सरावामध्ये चार जखमींची काल्पनिक परिस्थिती निर्माण करण्यात आली होती. सहभागी पथकांनी निर्धारित वेळेत घटनास्थळी पोहोचून श्वसन संरक्षण संच, सुरक्षा पथक, प्रथमोपचार पथक, अग्निशमन पथक, रुग्णवाहिका आणि वाहतूक नियंत्रण यंत्रणेचा प्रभावी वापर करत नियोजित पद्धतीने कार्यवाही केली. या संयुक्त सरावामध्ये क्लीन फिनो केम लि., अल्काइल अमाइन्स, सिप्ला, एटर्निस, एमक्युअर, ऑनर लॅब, कारगिल, हेनकेल, हार्मनी ऑरगॅनिक्स प्रा. लि. तसेच कुरकुंभ औद्योगिक क्षेत्रातील इतर औद्योगिक आस्थापनांनी सक्रिय सहभाग घेतला. व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), अग्निशमन विभाग आणि संबंधित स्थानिक यंत्रणांनी सरावाच्या नियोजन व अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सरावानंतर सहभागी विभाग आणि औद्योगिक आस्थापनांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत आढावा बैठक व समारोप चर्चा घेण्यात आली. यामध्ये सरावादरम्यान करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. तसेच भविष्यातील आपत्कालीन परिस्थितींना अधिक सक्षमपणे सामोरे जाण्यासाठी आवश्यक सुधारणा, परस्पर समन्वय आणि संवादव्यवस्थेबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य विभागाचे उपसंचालक श्री. अंकुश खराडे आणि प्रादेशिक अधिकारी श्री. हनुमंत पाटील यांनी सांगितले की, "औद्योगिक आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावी सामना करण्यासाठी केवळ उपकरणे व मनुष्यबळ उपलब्ध असणे पुरेसे नाही. जलद निर्णयक्षमता, प्रभावी संवाद, परस्पर समन्वय आणि नियमित सराव अत्यंत आवश्यक आहे. अशा संयुक्त सरावामुळे प्रत्यक्ष आपत्तीच्या वेळी जीवित व मालमत्तेची हानी कमीत कमी करण्यासाठी आवश्यक तयारी अधिक सक्षम करता येते." या सरावामध्ये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्रतिनिधी श्री. विठ्ठल बनोटे, व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य विभागाचे अधिकारी श्री. प्रवीण पाटील, श्री. विष्णू सांगोलकर, श्री. महेंद्र सावंत, श्री. विनोद मदुरकर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. विजय पेटकर, दौंड पोलीस प्रशासनाचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. गवळी, अग्निशमन दल, वैद्यकीय पथक, स्थानिक प्रशासन तसेच विविध औद्योगिक आस्थापनांचे प्रतिनिधी सहभागी झाले. सर्व सहभागी यंत्रणा व औद्योगिक आस्थापनांनी दाखविलेला सक्रिय सहभाग, उत्तम समन्वय आणि तत्पर प्रतिसाद यामुळे संयुक्त आपत्कालीन सराव यशस्वीरीत्या पार पडला.

काळदरी खोऱ्यात दुष्काळाने भात पीक धोक्यात

■ काळदरी (दै. संध्या)

ऐतिहासिक पुरंदर किल्ल्याच्या भोवताली काळदरी, बहिरवाडी, बांदलवाडी, पानवडी, घेरा पुरंदर, चिव्हेवाडी, मिसळवाडी, दवणेवाडी, धनकवडी, मांढर आज भीषण दुष्काळाच्या सावटाखाली होरपळून निघत आहे. पावसावर अवलंबून असणाऱ्या या दुर्गम भागातील भातशेती पावसाअभावी पूर्णतः करपून जाऊ लागली आहे. केवळ भातच नाही, तर जीवापाड जपलेली सोयाबीन, कारळ, उडीद आणि भुईमुगाची पिकेही डोळ्यांदेखत जळून खाक झाली आहेत. अस्मानी संकटाने घातलेला हा घाव इतका मोठा आहे की, वर्षभराच्या घामाचे रूपांतर मातीत होताना पाहून बळीराजाच्या डोळ्यांतील अश्रूही आता सुकून गेले आहेत.

शासनातर्फे ग्राम महसूल अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकारी बांधावर जाऊन पंचनामे करत आहेत, ही समाधानाची बाब असली, तरी शासनाची 'ई-पीक पाहणी' ही अट या दुर्गम भागातील शेतकऱ्यांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. काळदरी



खोऱ्यातील अनेक गावांत मोबाईलला रेंज नाहीत. अनेक कष्टकरी शेतकऱ्यांकडे साधे फोन असून अद्यावत अँड्रॉइड मोबाईल नाहीत. ज्यांच्याकडे मोबाईल आहेत, तिथे ॲपमध्ये लोकेशन चुकीचे दाखवणे, सर्व गट क्रमांक फार्मर आयडीला लिंक नसणे अशा तांत्रिक अडचणींचा डोंगर उभा राहिला आहे. नुकसानभरपाईचे अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी शेतकऱ्यांना सासवडला तालुक्याच्या ठिकाणी धाव घ्यावी लागत आहे. हातात दमडी नाही, दुष्काळामुळे शेतात दाणा पिकला नाही, त्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी शेतकरी मोलमजुरी करत आहेत.

मात्र कागदपत्रे काढण्यासाठी तालुक्याला जावे लागत असल्याने दिवसाची मजुरी बुडते, प्रवासाचा आणि कागदपत्रांचा खर्च वेगळाच सहन करावा लागतो. आधीच कर्जाच्या आणि नुकसानीच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी या त्रासाला अक्षरशः कंटाळला असून, काहींच्या मनात आत्महत्येसारखे

शासनाला बळीराजाची आर्त साद

"आम्ही निसर्गाशी दोन हात करत मातीतून सोनं पिकवणारे लोक आहोत. पण यंदा निसर्गाने घात केला. आता डिजिटल दाखले आणि कागदपत्रांच्या जंजाळात आम्हाला आणखी पिळू नका. जगाचा पोशिंदा जगला, तरच देश जगेल. सरकारने आमच्या परिस्थितीची जाणीव ठेवून सर्व अटी शिथिल कराव्यात आणि तात्काळ सरसकट नुकसानभरपाई जाहीर करावी," अशी आर्त हाक काळदरी खोऱ्यातील शेतकरी बांधव शासनाला घशात दाटलेल्या आवंढ्यासह करत आहेत.



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय येथे राष्ट्रीय सुरक्षेच्या बदलत्या आयामांवर परिषदेचे आयोजन

■ बारामती (दै. संध्या)

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथील संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागाच्या वतीने "National Security in the Digital Age: Artificial Intelligence, Cyber, Space, and Hybrid Warfare"या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

डिजिटल युगातील राष्ट्रीय सुरक्षेसमोरील आव्हाने, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, अंतराळ सुरक्षा आणि हायब्रिड वॉरफेअर या समकालीन विषयांवर या परिषदेत देश-विदेशातील तज्ज्ञ, संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी विचारमंथन केले. परिषदेत विविध विषयांवरील शोधनिबंधांचे सादरीकरण तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

परिषदेच्या उद्घाटन सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून नेदरलँड मधून डॉ.जिन इवीस एन्झाना, तज्ज्ञ वक्ते म्हणून कामरून मधून डॉ.अब्राहम मिन्को, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांनी परिषदेचे स्वागत आणि प्रास्ताविक केले तर डॉ.देविदास भोसले यांनी या परिषदेची प्रासंगिकता आणि ध्येय परिषदेसमोर मांडली. एकूण ३ सत्रांमध्ये राष्ट्रीय सुरक्षेच्या पारंपरिक संकल्पनांसोबतच तंत्रज्ञानाधारित सुरक्षेची वाढती गरज, कृत्रिम बुद्धिमत्तेचा संरक्षण क्षेत्रातील वापर, सायबर हल्ल्यांची वाढती शक्यता, अंतराळाचे सामरिक महत्त्व आणि हायब्रिड युद्धतंत्र या विषयांवर सखोल चर्चा झाली. परिषदेच्या माध्यमातून तंत्रज्ञान आणि राष्ट्रीय सुरक्षा यांचा वाढता परस्परसंबंध अधोरेखित करण्यात आला. भविष्यातील सुरक्षा आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संशोधन, नवोपक्रम, तांत्रिक क्षमता, धोरणात्मक विचार आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांची आवश्यकता असल्याचे मत डॉ. जिन इवीस एन्झाना एन्झाना यांनी प्रतिपादन केले. तर डॉ. अब्राहम मिन्को यांनी विविध नॉनस्टेट ॲक्टर भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करू शकतात यासंदर्भात त्यांनी आफ्रिकेचा संदर्भ दिला.

या परिषदेला देशातील विविध विद्यापीठे व महाविद्यालयांमधून संशोधक आणि अभ्यासकांनी ऑनलाइन माध्यमातून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यामुळे परिषदेला व्यापक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

परिषदेचे आयोजन संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले. परिषदेचे आयोजन सचिव प्रा. डॉ. देविदास विजय भोसले यांनी परिषद यशस्वी करण्यासाठी समन्वयकाची भूमिका बजावली. ही परिषद यशस्वी करण्यात आयोजन समिती, विविध उपसमित्या, तांत्रिक पथक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

परिषदेच्या समारोपप्रसंगी राष्ट्रीय रक्षा युनिवर्सिटीचे मोहम्मद युसफ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर या समारोपप्रसंगी उपप्राचार्य प्रा.डॉ.सचिन गाडेकर हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. सहभागी मान्यवरांचे, संशोधकांचे आणि सर्व उपस्थितांचे आभार भारती पब्लिकेशन नवी दिल्ली च्या अजय कुमार यांनी मानले. या परिषदेतून निर्माण झालेला शैक्षणिक संवाद आणि संशोधनाची दिशा भविष्यात राष्ट्रीय सुरक्षा विषयक अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

चेन स्नॅचिंग करणारे दोन आंतरराज्यीय आरोपी अटक; चौकशीत दोन गुन्हे उघडकीस

४ तोळे सोन्याचे दागिने व मोटारसायकलसह ६ लाख ३० हजारांचा मुद्देमाल हस्तगत

■ शिरूर (दै. संध्या)

रांजणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्यानंतर पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार तपास करताना पोलिसांनी चेन स्नॅचिंग करणाऱ्या दोन आंतरराज्यीय आरोपींना अटक करून त्यांच्याकडून दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. आरोपींकडून सुमारे चार तोळे सोन्याचे दागिने तसेच मोटारसायकल असा एकूण ६ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

रांजणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल झालेल्या जबरी चोरीच्या घटनांच्या अनुषंगाने पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची बैठक घेऊन मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पथकाने गुन्हे घडलेली ठिकाणे, गुन्ह्यांची वेळ आणि गुन्ह्यांची कार्यपद्धती यांचा आढावा घेतला. तसेच परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करून तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला.

या तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे चेन स्नॅचिंग करणारे आरोपी मोहम्मद इम्रान गयासुद्दिन शेख आणि मोहम्मद परवेज शहाबाज आलम दोघेही रा. तुलसीपूर जुमुनिया, ता. जुमुनिया, जि. भागलपूर, राज्य बिहार यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडे गुन्ह्याबाबत चौकशी केली असता त्यांनी



रांजणगाव पोलीस ठाणे तसेच आळेफाटा पोलीस ठाणे हद्दीतील या गुन्ह्यांची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. आरोपींकडून सुमारे चार तोळे सोन्याचे दागिने व मोटारसायकल असा एकूण ६ लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, पुणे ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार, पुणे विभाग, उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र भोसले, शिरूर उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, स्थानिक गुन्हे शाखा, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, संजय पडवाळ, पोलीस हवालदार पांडुरंग पंदारे, जनार्दन शेलके, संजय जाधव, राजू मोमीन, विकास पाटील आणि पोलीस कॉन्स्टेबल सागर धुमाळ यांनी केली आहे. पुढील तपास रांजणगाव पोलीस स्टेशन व आळेफाटा पोलीस स्टेशनकडून सुरू आहे.

ज्येष्ठांच्या निरोगी आयुष्यासाठी धामारीत आरोग्याचा जागर

तपासणीसोबत दिला 'दहा सूत्री मंत्र' - हिमोग्लोबिन, रक्तदाब व मधुमेहाची तपासणी

हिमोग्लोबिन, रक्तदाब व मधुमेहाची तपासणी; डॉ. भाऊसाहेब वाघमोडे यांचे ज्येष्ठांना आरोग्यविषयक मार्गदर्शन

■ कवठे येमाई (दै. संध्या)

आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून आयुष्मान आरोग्यवर्धिनी (आयुष) व उपकेंद्र, धामारी यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले. धामारी व परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.शिबिरात ज्येष्ठ नागरिकांची हिमोग्लोबिन, रक्तदाब, मधुमेह तसेच आवश्यक प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली. वाढत्या वयात उद्भवणाऱ्या आजारांचे वेळीच निदान व्हावे आणि आवश्यक उपचार व मार्गदर्शन मिळावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

आयुष्मान आरोग्यवर्धिनी धामारीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. भाऊसाहेब वाघमोडे यांनी वयानुसार शरीरात होणारे बदल, उच्च रक्तदाब, मधुमेह, कोलेस्टेरॉल, हृदयविकार, हाडांची झीज, सांधेदुखी, दृष्टी-श्रवण समस्या आणि मानसिक आरोग्य याबाबत मार्गदर्शन केले. छातीत दुखणे, अचानक घाम येणे, श्वास घेण्यास त्रास होणे, चेहरा किंवा हात-पाय एका बाजूला कमजोर होणे अथवा बोलण्यात अचानक अडचण येणे




अशी लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी, असे डॉ. वाघमोडे यांनी सांगितले. रक्तदाब व रक्तातील साखरेची नियमित तपासणी करण्याबरोबरच डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे बंद किंवा बदलू नयेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.ज्येष्ठांनी कमी मीठ, कमी साखर व कमी तेल असलेला संतुलित आहार घ्यावा. आहारात फळे, भाज्या, कडधान्ये आणि तंतुमय पदार्थांचा समावेश करावा. आपल्या आरोग्यस्थितीनुसार पुरेसे पाणी प्यावे तसेच चहा-कॉफीचे अतिसेवन टाळावे, असा सल्ला देण्यात आला. झोपेच्या गोळ्या स्वतःहून घेऊ नयेत आणि चांगल्या झोपेसाठी रात्री मोबाईलचा अतिवापर टाळावा, असेही सांगण्यात आले. नियमित आरोग्य तपासणी, रक्तदाब-मधुमेह नियंत्रण, संतुलित आहार, पुरेसे पाणी, क्षमतेनुसार नियमित व्यायाम, डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार, घरातील सुरक्षितता, डोळे-कान-दात व हाडांची काळजी, मानसिक आनंद आणि गंभीर लक्षणे दिसताच तातडीने वैद्यकीय सल्ला — असा आरोग्याचा दहा सूत्री मंत्र ज्येष्ठांना देण्यात आला. ज्येष्ठांनी पूर्णपणे निष्क्रिय न राहता आपल्या क्षमतेनुसार चालणे, हलका व्यायाम, स्ट्रेचिंग, संतुलनाचे व्यायाम, योग व प्राणायाम करावा. मानसिक आरोग्यासाठी कुटुंबीयांशी संवाद, सामाजिक सहभाग आणि सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी समुदाय आरोग्य अधिकारी सारिका राठोड, औषध निर्माण अधिकारी संदीप खैरे, योग प्रशिक्षक अंकुश घारे, आरोग्य सेवक निलेश शेंडे, आरोग्य सेविका आशा हिंगे, आशा सेविका तसेच माजी आरोग्य सहाय्यक शिवाजीराव पावशे यांनी सहकार्य केले.

> "वृद्धत्व हा आजार नाही; तो जीवनाचा एक सुंदर टप्पा आहे. योग्य आहार, नियमित व्यायाम, आवश्यक तपासण्या, डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार आणि आनंदी मन यामुळे ज्येष्ठांचे जीवन अधिक निरोगी, सक्रिय व समाधानकारक होऊ शकते."
> — डॉ. भाऊसाहेब वाघमोडे

यावेळी सरपंच सीमाताई शेळके, माजी सरपंच संपतराव कापरे, माजी ग्रामपंचायत सदस्य माधवराव पठारकर, ज्येष्ठ नागरिक सतीशराव गायकवाड, माजी मुख्याध्यापक श्रीधर गायकवाड सर, तुकाराम शेळके यांच्यासह अनेक ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते. आरोग्य तपासणीसोबतच दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारे मार्गदर्शन मिळाल्याने ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. योग प्रशिक्षक अंकुश घारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांचे वनराई बंधाऱ्यासाठी श्रमदान

■ सिंधुदुर्ग(दै. संध्या)

मागील ३५-४० वर्षांच्या कालावधीत सिंधुदुर्ग जिल्ह्यात यंदा सर्वात निचांकी पाऊस झाला आहे. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी खालावली असून, राज्य शासनाने जिल्ह्यात दुष्काळाचा 'ट्रिगर वन' लागू केला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात वाहून जाणारे पाणी बंधाऱ्यातून अडवून ते त्याच ठिकाणी जिरवणे, तसेच विहिरी आणि तलावांची पाणीपातळी वाढविणे हा पुढील ७-८ महिन्यांसाठी पाणी टिकवून ठेवण्याचा सर्वात सोपा आणि कमी खर्चाचा उपाय आहे, असे जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी सांगितले.

कुडाळ तालुक्यातील पिंगुळी ग्रामपंचायत हद्दीतील राऊळवाडी येथे वनराई बंधारा बांधण्यासाठी जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी स्वतः श्रमदान केले. यावेळी त्या बोलत होत्या. जिल्ह्यात लोकसहभागातून १० हजार बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, त्याहष्टीने प्रत्यक्ष कामांना सुरुवात झाली आहे. आज पर्यंत जिल्ह्यात ८०० हून अधिक बंधारे घालण्यात आले आहेत. या उपक्रमामुळे जलसंधारणाच्या कामांचे गांभीर्य नागरिकांमध्ये निर्माण झाले असून, लोकसहभागातून ही चळवळ पुढे जात असल्याचे जिल्हाधिकारी धोडमिसे यांनी सांगितले. पालकमंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत



जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी या मोहिमेला चांगला प्रतिसाद दिला आहे. शाळा, महाविद्यालये तसेच विविध शासकीय संस्थांमधील अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थीही या मोहिमेत सहभागी झाले आहेत. सिंधुदुर्ग जिल्हावासी या उपक्रमात उत्तम पद्धतीने सहभागी होत असून, जलसंधारणासाठी लोकसहभागातून व्यापक चळवळ उभी राहत असल्याचे त्यांनी नमूद केले. वनराई बंधारे हे कमी खर्चाचे असून, पाणी अडवून ते जास्तीत जास्त काळ जमिनीत जिरवणे हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. कच्चे बंधारे जास्त पावसात टिकत नाहीत. मात्र, त्यासाठी तांत्रिक ज्ञान घेऊन योग्य जागेची निवड करणे आणि बंधाऱ्यावर आवश्यक आच्छादन घालणे गरजेचे आहे. त्यामुळे बंधारा उभारताना तांत्रिक बाबींची योग्य पद्धतीने अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी धोडमिसे यांनी सांगितले. पक्क्या बंधाऱ्यांच्या संरचनांमध्ये पाणी अडवले जाते. अशा बंधाऱ्यांच्या दुरुस्तीबरोबरच त्यामध्ये साचलेला गाळ काढण्याच्या परवानगीबाबत कालच जलसंधारण विभागाशी चर्चा केली आहे. याबाबत जिल्हा पातळीवरही काही निर्णय घेता येतील का, याची तपासणी सुरू असल्याचे जिल्हाधिकारी धोडमिसे यांनी सांगितले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुरू असलेल्या जलसंधारणाच्या कामांची इतर जिल्ह्यांकडूनही दखल घेतली जात आहे. या मोहिमेबाबत वरिष्ठ पातळीवरूनही कौतुक केले जात असून, जिल्ह्यात लोकसहभागातून सुरू झालेल्या जलसंधारणाच्या या उपक्रमाला व्यापक प्रतिसाद मिळत असल्याचे जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी यावेळी सांगितले. यावेळी उपविभागीय अधिकारी ऐश्वर्या काळूशे, तहसीलदार सचिन पाटील, जिल्हा परिषद सदस्य गंगाराम सडवेलकर, पंचायत समिती सदस्य ममता राऊळ, सरपंच अजय आकेरकर, गट विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी भास्कर चौगुले, मंडळ कृषी अधिकारी विजय घोंगे, गायत्री तेली, सहायक कृषी अधिकारी सविता हरमलकर, नायब तहसीलदार अमरसिंह जाधव, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष उमेश तोरसकर, कुडाळ तालुका अध्यक्ष विजय पालकर, पत्रकार प्रमोद म्हाडगुत, रोहन नाईक, संजय तेंडोलकर, निलेश ओरोसकर, प्रसाद राणे, एसआरएम कॉलेजचे विद्यार्थी-शिक्षक, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी यांच्यासह पिंगुळी गावातील ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

थोडक्यात पण महत्वाचे

समुद्रकिनाऱ्याच्या सुशोभीकरणाला गती द्यावी : मंत्री नितेश राणे

मुंबई : रायगड जिल्ह्यातील आरावी समुद्रकिनाऱ्याच्या सुशोभीकरणाचे काम मार्गी लावण्यासाठी आवश्यक परवानग्या व विभागीय अडचणी दूर करून कामाला गती देण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आरावी समुद्रकिनाऱ्याच्या पर्यटनदृष्ट्या विकास होणे महत्वाचे असून, याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याची सूचना केली होती. भाऊचा धक्का ते दिवेआगार प्रस्तावित रो रो सेवेबाबत, बागमांडला जेट्टी येथील वाहनतळाच्या पार्किंगबाबत, मौजे कारविणे येथील श्रीकृष्ण जेट्टीची दुरूस्ती व जेट्टीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाबाबत, दिवेआगार जेट्टीबाबत, आरावी समुद्रकिनारी सुशोभीकरण, मुळगांव बंधारा लगतच्या जमिनीच्या महाराष्ट्र सागरी मंडळाची मालकी करण्याबाबत मंत्रालयात आढावा बैठक झाली. यावेळी पर्यटन व विकासाच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. आरावी समुद्रकिनारा गेल्या दीड-दोन वर्षांत पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत असून पर्यटकांची संख्या वाढत आहे. त्यामुळे या ठिकाणी आवश्यक पायाभूत सुविधा, स्वच्छता व सुशोभीकरणाची कामे होणे गरजेचे असल्याचे मंत्री आदिती तटकरे यांनी नमूद केले. पर्यटकांची वाढती वर्दळ लक्षात घेता अनधिकृत स्वरूपात स्टॉल किंवा झोपड्या उभारल्या जाण्याची शक्यता असून त्यापूर्वीच नियोजनबद्ध पद्धतीने समुद्रकिनाऱ्याचा विकास करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. आरावी समुद्रकिनाऱ्यालगत कांदळवन, बफर झोन तसेच सागरी किनारपट्टी नियमन क्षेत्राशी संबंधित बाबींची तपासणी करून संबंधित विभागांनी आवश्यक कार्यवाही करावी, अशी चर्चा यावेळी झाली. कासव संवर्धनाच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या परिसरात पर्यटन विकास करताना पर्यावरणाचे संरक्षण कायम ठेवण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. विकासकामे करताना कासवांच्या अधिवासाला बाधा न आणता पर्यटन सुविधा विकसित करण्याबाबत संबंधित यंत्रणांनी समन्वयाने मार्ग काढावा, असे निर्देश देण्यात आले. दिवेआगर समुद्रकिनाऱ्याच्या सुमारे ४ ते ४.५ किलोमीटरच्या पट्ट्याच्या विकासाबाबतही बैठकीत चर्चा झाली. या परिसरात कासव संवर्धन सुरू असून त्याचबरोबर पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक सुविधा विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. समुद्रकिनाऱ्याच्या बंधाऱ्याच्या कामासोबत पुढील टप्प्यात सुशोभीकरण व पर्यटन सुविधा विकसित करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

हिवाळी अधिवेशनात 'पीसीपीएनडीटी' कायद्यात सुधारणा विधेयक आणणार

मुंबई : प्रसुतीपूर्व गर्भ लिंग निदान करून स्त्री भ्रुण हत्या करणा-या डॉक्टरांवर कठोर कारवाई होण्यासाठी गर्भधारणा पूर्व व प्रसुतीपूर्व निदानतंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ व २००३ मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. असे गुन्हे करणाऱ्या डॉक्टरांवर लावण्यात येणारे कलम अधिक कठोर करण्यासोबतच, गुन्हेगारांवर मोक्का लावणे, गुन्हे सिद्धता आणि शिक्षा यात बदल करणे आवश्यक असून येत्या हिवाळी अधिवेशनात या कायद्यात सुधारणा विधेयक सादर करण्यात येईल, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. गर्भधारणा पूर्व व प्रसुतीपूर्व निदानतंत्रे लिंग निवडीस प्रतिबंध कायदा १९९४ व २००३ च्या कठोर अंलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृती दलाची पहिली बैठक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली, यावेळी ते बोलत होते. यावेळी कृती दलाच्या अध्यक्ष आमदार डॉ. निलम गोऱ्हे, सदस्य आमदार मनीषा कायंदे, आमदार उमा खापरे, आणि आमदार स्नेहा दुबे - पंडीत व आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर उपस्थित होते. राज्यस्तरीय कृती दलाचे काम जिल्हा स्तरापर्यंत पोहचवणे आवश्यक आहे. जेणेकरुन जिल्हा स्तरावरून याबाबत तक्रारी प्राप्त होतील. यासाठी समितीचा कालबद्ध कार्यक्रम ठरविण्यात यावा. तसेच या कामासाठी समर्पित अधिकारी आणि कर्मचारी यांचा चमू नेमून देण्यात यावा. नोंदणी नसलेल्या बोगस डॉक्टरांची यादी तयार करून प्रसिद्ध करण्यात यावी जेणेकरून बोगस डॉक्टरांची माहिती नागरिकांना मिळून त्यांच्यावर लक्ष ठेवण्याचे काम जनताही करेल. अशा बोगस डॉक्टरांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही मंत्री आबिटकर यांनी दिले.

ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिक्षण व रोजगाराच्या संधी विस्तारण्यासाठी योजनांना गती द्या : बावनकुळे

■ मुंबई (दै. संध्या)

इतर मागास बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी वसतिगृह, स्वाधार योजना, शिष्यवृत्ती तसेच महाज्योतीच्या विविध उपक्रमांना अधिक बळकटी देऊन त्यांच्या अंमलबजावणीला गती द्यावी, असे निर्देश महसूलमंत्री तथा इतर मागासवर्ग मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. मराठा समाजासाठी नेमण्यात आलेल्या शिंदे समितीप्रमाणे विमुक्त जाती, भटक्या जमातींच्या समस्यांचा अभ्यास करुन अहवाल देण्यासाठी समिती नेमण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याची सूचना यावेळी करण्यात आली.

मंत्रालयात मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या इतर मागासवर्ग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत ओबीसी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीशी संबंधित विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधींसाठी शासनाच्या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यावर उपसमितीने भर दिला.

महाज्योतीच्या विविध योजनांसाठी आवश्यक निधी आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. महाज्योतीच्या योजनेतर खर्चासाठी 2025-26 मध्ये 499 कोटी रुपये आणि बांधकामासाठी 228.64 कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे. 2026-27 साठी योजनेतर खर्चाकरिता 299 कोटी रुपये आणि बांधकामासाठी 25 कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात संस्थेला निधी उपलब्ध करून देण्यासाठी एकूण एक हजार 300 कोटी रुपयांचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

महाज्योतीमार्फत राबविण्यात येणारे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, पीएच.डी. अधिछात्रवृत्ती आणि इतर शैक्षणिक उपक्रमांचा लाभ पात्र विद्यार्थ्यांना पारदर्शकपणे द्यावा. निवड यादी गुणांसह संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी आणि तालुकास्तरावरील शिबिरे, शाळा, महाविद्यालये तसेच विविध संस्थांच्या माध्यमातून योजनांची व्यापक प्रसिद्धी करावी, अशा सूचनाही मंत्री बावनकुळे यांनी दिल्या. ओबीसी समाजातील युवकांना स्वयंरोजगार आणि कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महामंडळांच्या कर्ज, व्याज परतावा आणि प्रशिक्षण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. जिल्हास्तरावर विविध महामंडळांचे अर्ज स्वीकारण्यासाठी एक खिडकी सुविधा कार्यान्वित करून पात्र लाभार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने योजनांचा लाभ सुलभतेने उपलब्ध करून देण्याच्या कार्यवाहीबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

महा उपलब्धी'ॲपद्वारे निवृत्तीवेतन सेवा अधिक सुलभ : बागला

■ मुंबई(दै. संध्या)

निवृत्तीवेतनधारकांना घरबसल्या पारदर्शक, सुरक्षित आणि गतिमान सेवा उपलब्ध करून देण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या डिजिटल सुविधांचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन वित्त विभागाच्या लेखा व कोषागारे विभागाच्या प्रधान सचिव रिचा बागला यांनी केले. 'महा उपलब्धी'ॲपद्वारे निवृत्तीवेतन सेवा अधिक सुलभ होणार असल्याचेही प्रधान सचिव बागला यांनी सांगितले.

'महा उपलब्धी' मोबाईल ॲपच्या माध्यमातून निवृत्तीवेतनविषयक विविध सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, या सुविधांची माहिती निवृत्तीवेतनधारकांपर्यंत पोहोचविण्यासाठी संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य आणि अधिदान व लेखा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'एमएमआरडीए'च्या नवीन इमारतीत आयोजित जनजागृती कार्यशाळेत त्या बोलत होत्या. यावेळी लेखा व कोषागारे विभागाच्या संचालक दीपा देशपांडे, अधिदान व लेखा अधिकारी प्रगती धनावडे, उपसंचालक प्रमोद पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रधान सचिव रिचा बागला म्हणाल्या, मागील दीड ते दोन वर्षांत अधिकारी, कर्मचारी आणि तांत्रिक पथकाने केलेल्या प्रयत्नांचे फलित या प्रणालीच्या माध्यमातून समोर आले आहे. भविष्यातही नवीन सुविधा आणि अतिरिक्त सुरक्षा स्तरांचा समावेश करून प्रणाली अद्ययावत केली जाणार आहे. दरवर्षी नोव्हेंबरमध्ये जीवन प्रमाणपत्र सादर करण्यासाठी निवृत्तीवेतनधारकांना होणारी धावपळ कमी करण्याच्या दृष्टीने ही सुविधा महत्वाची ठरणार आहे. महाराष्ट्राने विकसित केलेल्या या डिजिटल प्रणालीची केंद्र शासनाच्या पेन्शनर्स वेल्फेअर विभागानेही दखल घेतली असून, या प्रणालीबाबत माहिती घेण्यात स्वारस्य दाखविले आहे.

हिंगोलीतील फटाका दुर्घटना अत्यंत दुर्दैवी : झिरवाळ

■ हिंगोली(दै. संध्या)

हिंगोली शहरातील मारवाडी गल्ली परिसरात फटाक्यांच्या साठवणुकीच्या ठिकाणी लागलेली आग अत्यंत दुर्दैवी व गंभीर आहे. या दुर्घटनेत प्राथमिक माहितीनुसार दोन नागरिकांचा मृत्यू झाला असून अनेक नागरिक जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने आवश्यक ते सर्वोत्तम उपचार मिळावेत, अशा सूचना प्रशासनाला देण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली. दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांप्रती त्यांनी सहवेदना व्यक्त केल्या.

नियमांनुसार फटाक्यांची साठवणूक, आवश्यक परवानग्या आणि सुरक्षेच्या नियमांचे पालन आदी बाबींची सखोल चौकशी करण्याचे निर्देश हिंगोली जिल्हाधिकाऱ्यांना पालकमंत्र्यांनी दिले. चौकशीत नियमांचे उल्लंघन किंवा



निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाईचे निर्देशही त्यांनी दिले.

जिल्ह्यातील सर्व फटाका विक्री व साठवणूक केंद्रांची तातडीने तपासणी करावी. या ठिकाणी सुरक्षाविषयक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी होत असल्याची खात्री करावी, अशा सूचनाही पालकमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

नाशिकमध्ये साकारणार फुटबॉलचे अत्याधुनिक मैदान; पालकमंत्री गिरीश महाजन यांचा पुढाकार

■ नाशिक(दै. संध्या)

नाशिकच्या क्रीडा क्षेत्राला नवसंजीवनी देणारा आणि स्थानिक खेळाडूंच्या स्वप्नांना नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय जिल्हा नियोजन समितीअंतर्गत घेण्यात आला आहे. राज्याचे जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या विशेष पुढाकारातून आणि पाठपुराव्यामुळे नाशिक शहरातील राष्ट्रीय दर्जाचे अद्ययावत फुटबॉल मैदान विकसित करण्यास तसेच हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर रात्रीच्या सामन्यांसाठी अत्याधुनिक विद्युत झोत (हाय-मास्ट फ्लडलाईटस्) सुविधा उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकान्वये दिली आहे.

गेल्या काही वर्षांत नाशिकने राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील धावपटू, क्रिकेटपटू आणि विविध क्रीडा प्रकारातील खेळाडू घडविले आहेत. उच्च दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधासाठी खेळाडूंना सरावासाठी मुंबई, पुणे यांसारख्या महानगरांकडे जावे लागत होते. आता पालकमंत्री श्री. महाजन यांच्या पुढाकारामुळे नाशिकमधील खेळाडूंना शहरातच स्थानिकस्तरावर उच्च दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध होणार आहेत.

नवीन फुटबॉल मैदानामध्ये उच्च दर्जाच्या लॉनसह योग्य ड्रेनेज सिस्टिम, पाण्याचा निचरा करणारी यंत्रणा आणि मैदानाच्या मानक आकारानुसार आवश्यक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. त्यामुळे खेळाडूंना नियमित व दर्जेदार सरावासाठी उत्तम मैदान उपलब्ध होईल.

मैदानामुळे सामान्य व खडबडीत मैदानावर खेळताना होणाऱ्या दुखापतींचे प्रमाणही कमी होण्यास मदत होणार आहे. या सुविधेमुळे नाशिकमध्ये राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील फुटबॉल स्पर्धा तसेच व्यावसायिक लीगचे आयोजन करणे शक्य होणार आहे. आधुनिक क्रिकेटमध्ये दिवस-रात्र सामने आणि टी-२० फॉर्मेट लोकप्रिय आहे. हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक हाय-मास्ट फ्लडलाइट्समुळे नाशिकच्या क्रिकेटपटूंना रात्रीच्या प्रकाशात सराव करण्याची सुविधा मिळणार आहे. नोकरी, शाळा व महाविद्यालय सांभाळणाऱ्या खेळाडूंनाही सायंकाळनंतर किंवा रात्री सराव करता येणार असल्याने त्यांच्या क्रीडा कौशल्याला अधिक वाव मिळेल.

या सुविधेमुळे नाशिकमध्ये नाईट क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करणे शक्य होणार असून, स्थानिक खेळाडूंना आपले कौशल्य मोठ्या व्यासपीठावर दाखविण्याची संधी मिळणार आहे. पालकमंत्री श्री. महाजन यांच्या पुढाकारातून निर्माण होणाऱ्या या उच्च दर्जाच्या क्रीडा सुविधांमुळे नाशिकमध्ये राज्यस्तरीय स्पर्धांचे प्रमाण वाढण्यास मदत होणार आहे.

बंद मनपा शाळांचे पुनरुज्जीवन करून विद्यार्थीसंख्या वाढविण्यावर भर द्यावा : मंत्री दादाजी भुसे

■ नाशिक(दै. संध्या)

नाशिक महानगरपालिका हद्दीतील बंद असलेल्या शाळांची आवश्यक दुरुस्ती व पायाभूत सुविधांसह पुनरुज्जीवन करून पुन्हा सुरू कराव्यात. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, स्वच्छ व सुविधायुक्त शैक्षणिक वातावरण निर्माण करून विद्यार्थीसंख्या वाढविण्यासाठी प्रभावी नियोजन करावे, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले.

मंत्री भुसे यांनी आज नाशिक शहरातील पंचवटी येथील मनपा प्राथमिक शाळा क्र. ३०, सिडको येथील मनपा माध्यमिक शाळा तसेच जेलरोड येथील मनपा शाळा क्र. ५६ येथे भेट देऊन शाळांची पाहणी केली.

त्यावेळी त्यांनी सूचना दिल्या. यावेळी महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे, अजय बोरस्ते, प्रविण तिदमे यांच्यासह महानगरपालिका प्रशासनातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री दादाजी भुसे यांनी शाळांमधील उपलब्ध शैक्षणिक सुविधा, वर्गखोल्या, इमारतींची सद्यस्थिती, पायाभूत सुविधा तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेतला. महानगरपालिका हद्दीतील सध्या बंद असलेल्या सर्व शाळांची सद्यस्थिती तपासून त्यांचे योग्य पद्धतीने वर्गीकरण करावे.


ज्या शाळांच्या इमारती अथवा परिसरात दुरुस्तीची आवश्यकता आहे, तेथील कामे प्राधान्याने व तातडीने पूर्ण करावीत.






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनेलचा कानाडवाडीत होम टू होम प्रचार

कानाडवाडी : दैनिक संध्या

श्री सोमेश्वर सहकारी कारखाना लि. सोमेश्वरनगर पंचवार्षिक निवडणूक २०२६-२०३१ प्रचारात लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनलच्या उमेदवारांना ऊस उत्पादक शेतकरी व कारखान्याच्या सभासदांचा मोठ्या संख्येने पाठिंबा मिळत आहे. कारखान्याचे माजी चेअरमन पुरुषोत्तम जगताप यांच्या मार्गदर्शनात कानाडवाडी येथे लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनलच्या उमेदवारांचा सभासदांच्या होम टू होम प्रचार करण्यात आला.या प्रचार दौऱ्यात सभासदांचा मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कारखान्याच्या विकासासाठी कानाडवाडीतील सभासद पुरुषोत्तम जगताप यांच्या कायम सोबत आहेत त्यासाठी शिट्टी चिन्हासमोर शिक्का मारून लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनलच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून देणार असल्याचेही उपस्थित सभासदांनी यावेळी सांगितले.



श्राद्धाचा खर्च टाळून दिव्यांगांना दिला जीवनावश्यक शिधा

सासवड : दैनिक संध्या

वर्षानुवर्ष सुरू असलेल्या रूढी, परंपरांना फाटा देत आपल्या आजोबांच्या स्मरणार्थ श्राद्धाचा खर्च टाळून दिव्यांग विद्यार्थ्यांना शिधा देण्याचा निर्णय वाघिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे व त्यांच्या कुटुंबीयांनी घेतला. स्वर्गीय यशवंतराव कृष्णराव शितोळे यांच्या स्मृती निमित्त शितोळे परिवारातील आनंदराव यशवंतराव शितोळे व उषा शितोळे यांनी यशवंतराव शितोळे यांच्या स्मरणार्थ दिवे येथील जीवन वर्धिनी मतिमंद निवासी विद्यालय येथे जीवनावश्यक वस्तू दिल्या. गहू ५० किलो, तांदूळ २५ किलो, हरभरा डाळ पाच किलो, तूरडाळ पाच किलो, साखर दहा किलो, गूळ पाच किलो, पोहे पाच किलो आणि एक तेल डबा अशा स्वरूपातील शिधा वस्तू स्वर्गीय यशवंतराव शितोळे यांचे नातू व वाघिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांच्या हस्ते संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब झेंडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शरद मांदळे, राजेंद्र पायगुडे, संस्थेचे संचालक तानाजी सातव, रोहिणी झेंडे, शरद लांघी आदी उपस्थित होते. दिव्यांगांना दिल्या जाणाऱ्या विविध कौशल्य विकास कार्यक्रमाची उपक्रमांची माहिती प्राचार्य शितोळे यांनी यावेळी घेतली तसेच मुलांमधील कौशल्य विकसित करण्यासाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून मदत केली जाईल असे सांगितले.

पंचनाम्यासाठी भरमसाठ कागदपत्रांची मागणी; शेतकऱ्यांची टिंगल करू नका

पुरंदर : दैनिक संध्या

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आला असून, पांगारे गावातील नुकसान झालेल्या पिकांची पाहणी व पंचनामे करण्याचे काम कृषी विभाग, तलाठी व ग्रामसेवक यांच्यामार्फत सुरू करण्यात आले आहे. मात्र, या पंचनाम्यासाठी शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात कागदपत्रांची मागणी करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. पंचनाम्यासाठी शेतकऱ्यांनी जिओ-टॅग केलेला पिकाचा फोटो, Farmer ID ची प्रत, बँक पासबुकची प्रत, आधार कार्डची प्रत, ७/१२ उतारा आणि ८-अ उतारा सादर करावा, अशी सूचना कृषी विभागामार्फत करण्यात आली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अल्प कालावधीत एवढी कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची सक्ती करणे हे अन्यायकारक असल्याचे मत सजग नागरिक मंच, पांगारेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काकडे यांनी व्यक्त केले आहे. काही वर्षांपूर्वी शासनाने Farmer ID ही संकल्पना आणली. शेतकऱ्याने आपले आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक खाते, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी तसेच आपल्या मालकीच्या जमिनीचे ७/१२ व ८-अ यांसारखे आवश्यक दस्तऐवज शासनाच्या यंत्रणेकडे एकदाच सादर करावेत आणि त्यांची माहिती शासनाच्या प्रणालीमध्ये जतन केली जावी, या उद्देशाने Farmer ID व्यवस्था करण्यात आली होती. भविष्यात विविध शासकीय योजनांसाठी शेतकऱ्याने केवळ Farmer ID दिल्यास आवश्यक माहिती शासनाला उपलब्ध होईल, असे सांगण्यात आले होते.

श्री महालक्ष्मी मंदिरात नवरात्रोत्सवाची धूम

पुणे : दैनिक संध्या

दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबागच्या वतीने आयोजित सार्वजनिक नवरात्रोत्सव उत्साहात साजरा केला जाणार आहे. रविवार (दि. ११) ते मंगळवार (दि. २०) या कालावधीत नवरात्रोत्सवानिमित्त धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम रंगणार आहेत. रविवारी (दि. ११) नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी सकाळी ९ वाजता बेलराईज इंडस्ट्रीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्रीकांत बडवे आणि सुप्रिया बडवे यांच्या हस्ते घटस्थापना होणार आहे. तसेच, सायंकाळी ६ वाजता मंदिरावरील विद्युत रोषणाईचे उद्घाटन पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते होईल. 'शृंगार' या संकल्पनेवर आधारित मंदिरात आकर्षक सजावट करण्यात येणार असून, मंदिराचे भव्य प्रवेशद्वार देखील या संकल्पनेवर साकारले जाणार आहे, अशी माहिती मंदिर ट्रस्टच्या प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली. यंदाच्या संपूर्ण उत्सवात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांच्या हस्ते आरती, तसेच त्यांचा सन्मान सोहळा देखील आयोजित केला आहे. पत्रकार परिषदेला मंदिर ट्रस्टचे प्रमुख संस्थापक आणि विश्वस्त राजकुमार अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी, उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल, भरत अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर आदी उपस्थित होते. अमिता अग्रवाल म्हणाल्या, सोमवारपासून (दि. १२) रोज सायंकाळी ५ वाजता विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला शक्तीचा सन्मान मंदिरात होणार आहे.



लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनलच्या गावभेट दौऱ्यात जोरदार शक्तिप्रदर्शन

मा. आमदार संजय जगताप, पुरुषोत्तम जगताप यांच्यासह सभासदांचा उत्स्फूर्त सहभाग

■ मांडकी (दै. संध्या)

श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना पंचवार्षिक निवडणूक २०२६ लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनलच्या गावभेट दौऱ्यात जोरदार शक्तिप्रदर्शन करत प्रचारसभा घेण्यात आल्या. मांडकी,लळपतवाडी,जेऊर,पिसुर्टी या गावभेट दौऱ्यात भाजपा नेते मा.आमदार संजय जगताप,पुरुषोत्तम जगताप यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी,सभासदांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग घेतला.

श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन पुरुषोत्तम जगताप यांनी त्यांच्या कार्यकाळात कारखान्याचा कारभार चांगल्याप्रकारे सांभाळला आहे व सभासदांच्या ऊसाला चांगला भाव मिळवून दिला आहे.

याच कृतज्ञतेतून गटतट बाजूला ठेवून शिट्टी या चिन्हासमोर सभासद बंधूंनी लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनलच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन गावभेट दौऱ्यावेळी पॅनलच्यावतीने करण्यात आले.



शिक्षक आमदारकीच्या रणांगणात मंगेश चिवटेंची दमदार एंट्री

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे–डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने उमेदवारी; मंत्री उदय सामंत,प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत जोरदार शक्तिप्रदर्शन



■ पुणे (दै. संध्या)

पुणे विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीची रणधुमाळी आता चांगलीच रंगू लागली असून, शिवसेनेचे अधिकृत उमेदवार मंगेश चिवटे यांनी आज जोरदार शक्तिप्रदर्शनात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार मंगेश चिवटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करत शिक्षक आमदारकीच्या निवडणुकीत अधिकृतपणे दंड थोपटले.मंत्री उदय सामंत साहेब आणि मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते,समर्थक तसेच शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.भगवे झेंडे,घोषणांचा गजर आणि कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त जोश यामुळे परिसर शिवसेनामय झाला.

या प्रसंगी राज्यसभा खासदार ज्योती ताई वाघमारे,आमदार सुहास बाबर,आमदार महेंद्र दळवी, आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आमदार शहाजीबापू पाटील आणि माजी आमदार रवींद्र धंगेकर,पैलवान चंद्रहार पाटील, सातारा संपर्कप्रमुख शरद कणसे, एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे बापूसाहेब अडसूळ,बाजीराव चव्हाण,किरण साळी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख प्रशांत साळुंखे, कोल्हापूर जिल्हाप्रमुख मनमोहन खोत, शहरप्रमुख विनायक जाधव, उपशहरप्रमुख अतुल साळोखे, शिरोळ तालुकाप्रमुख सचिन डोंगरे, गगनबावडा तालुकाप्रमुख अक्षय साखरे आणि जयसिंगपूर शहरप्रमुख महेश धनवडे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मंगेश चिवटे यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शविला. शिक्षकांच्या प्रश्नांना विधानपरिषदेत प्रभावीपणे वाचा फोडणे, शिक्षकांचा सन्मान आणि हक्कांसाठी ठामपणे आवाज उठवणे, या भूमिकेला केंद्रस्थानी ठेवून मंगेश चिवटे यांची उमेदवारी असल्याचे यावेळी समर्थकांकडून सांगण्यात आले. या शक्तिप्रदर्शनातून आगामी निवडणुकीसाठी शिवसेनेची संघटनात्मक ताकद दाखवून देण्यात आली. "अर्ज भरला बरका... आता भेटू विजयी मिरवणुकीत!" या जोशपूर्ण घोषणेने कार्यकर्त्यांनी विजयाचा निर्धार व्यक्त केला. मंगेश चिवटे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या निमित्ताने पुणे विभागीय शिक्षक मतदारसंघातील राजकीय वातावरणाला चांगलीच धार आली आहे.

पुणे विभाग शिक्षक मतदार संघाकरिता निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती

■ पुणे (दै. संध्या)

भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक म्हणून डॉ. हनमनलू तुम्मोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती शीतल तेली- उगले यांनी दिली आहे.

श्री. तुम्मोड यांचा निवासाचा पत्ता 'शिवनेरी', व्हीव्हीआयपी सर्कीट हाऊस, बंडगार्डन पुणे असा असून त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ८२०८३८७७६९ असा आहे. निवडणूक निरीक्षक यांना व्हीव्हीआयपी सर्कीट हाऊस येथे सकाळी सकाळी १० ते दुपारी ११ वा. या कालावधीत भेटता येईल. तसेच नमूद भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल. निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी अनिल बडे हे असून त्यांचा संपर्क क्र. ९२८४०५८४११ असा आहे, असेही निवडणूक प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

स्वरदाचा मल्लखांब स्पर्धेत प्रथम क्रमांक

■ पिंपरी(दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे जिल्हा परिषद क्रीडा विभाग यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या इयत्ता सहावी मधील विद्यार्थिनी स्वरदा यादव हिने उत्कृष्ट सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटकावला. ज्ञान प्रबोधिनी विद्यालयात झालेल्या या १७ वर्षे वयोगटातील स्पर्धेत रोप मल्लखांब व पोल मल्लखांब यामध्ये स्वरदा यादव हिने सर्वात जास्त गुण मिळवले यामुळे तिची पुणे विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचे क्रीडा शिक्षक धनाजी पाटील हे तिचे मार्गदर्शक आहेत. रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलमध्ये शालेय अभ्यासक्रम बरोबरच विद्यार्थ्यांना वैयक्तिक व सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये नैपुण्य प्राप्त करण्यासाठी उत्कृष्ट सेवा सुविधा उपलब्ध करून दिला जातात.याचा स्वरदा यादव हिला उपयोग झाला आणि तिला हे यश प्राप्त करता आले.



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसरात स्वच्छता अभियान

■ बारामती (दै. संध्या)

सेवा संकल्प अभियानांतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती परिसर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्याच्या उद्देशाने अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

महाविद्यालय व रुग्णालय परिसरातील स्वच्छता राखणे, परिसराचे सौंदर्यीकरण करणे तसेच स्वच्छतेबाबत जनजागृती वाढविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता. अभियानात महाविद्यालयातील प्राध्यापक, वैद्यकीय व नर्सिंग विद्यार्थी, तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी, परिचारिका तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अभियानादरम्यान महाविद्यालय व रुग्णालय परिसरातील विविध ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. कचऱ्याचे योग्य संकलन व विलगीकरण, परिसर स्वच्छ ठेवणे आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचे महत्त्व याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच "स्वच्छ परिसर, निरोगी समाज" हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. या उपक्रमाच्या नियोजनासाठी डॉ. मीनल शिंगाडे, सहयोगी प्राध्यापक, शरीरविकृतीशास्त्र विभाग यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली. निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रविण हाके यांनी समन्वयासाठी सहकार्य केले.



वैद्यकीय व नर्सिंग विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे स्वच्छतेचा संदेश विद्यार्थी, रुग्ण, नातेवाईक आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे. स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून महाविद्यालय व रुग्णालय परिसर सातत्याने स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्याचा संकल्प करण्यात आला असल्याचे श्रीमती पाटील यांनी सांगितले.